मुंबई ▪ सांगली ▪ कोल्हापूर ▪ नवे विचार...नवी सुरुवात ▪ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

▪ मुख्य संपादक : **गणेश पाटील** (सावर्डेकर) Mo. 9011889001

▪ सांगली ▪ कोल्हापूर ▪ सातारा ▪ पुणे ▪ अहिल्यानगर ▪ वर्ष : ६ ▪ अंक : १९० ▪ सोमवार, १३ ऑक्टोबर २०२५ ▪ किंमत: ३ रुपये ▪ पाने : ४+४









# तरच गुन्हेगारी मोडीत काढण्याचे उद्दिष्ट सफल होईल

व्यावसायिक असल्याचे कारण, स्वतःच्या व कुटुंबीयांच्या जीविताला धोका अशा विविध कारणास्तव शस्त्र परवाना दिला जातो. शस्त्र परवाना देण्याचा अधिकार हा संबंधित जिल्हाधिकारी व पोलीस आयुक्तांना असतो. मात्र गेल्या काही वर्षांत प्रत्येक क्षेत्रात राजकीय हस्तक्षेप वाढला असून शस्त्र परवाना देण्यातही राजकीय हस्तक्षेप वाढल्याने पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्त्यांना शस्त्र परवाना सहज उपलब्ध होतात. एकूण राजकीय हस्तक्षेप वाढीमुळे एका अर्थाने गुन्हेगारीला पाठबळ मिळत आहे. राज्यातील गुन्हेगारीच्या वाढत्या घटनांमुळे जनतेच्या मनात दहशत निर्माण झाली आहे. महिलांवरील अत्याचार, खून, खंडणी अशा घटनांमध्ये वाढ झाली हे अलीकडच्या काळात घडलेल्या घटनांतून समोर आले आहे. बीड जिल्ह्यात महिलेला जबर मारहाण केल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला. एकीकडे गुन्हेगारी मोडीत काढण्याचा सूर राजकीय नेत्यांकडून आळवला जातो, तर दुसरीकडे राजकीय नेतेमंडळीच गुन्हेगारीला अप्रत्यक्ष खतपाणी घालत असल्याचे अनेक घटनांमधून समोर आले आहे. पुण्यातील गुंड निलेश घायवळ याला शस्त्र परवाना दिल्याचे प्रकरण उजेडात आले आणि राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागली आहे. त्यात गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचे वडील रामदास कदम यांनी तर घायवळ याला शस्त्र परवाना देण्यासाठी विधिमंडळातील बड्या नेत्याने शिफारस केल्याचा खळबळजनक दावा केला आहे. रामदास कदम यांचा दावा आणि राजकीय नेत्यांचे गुन्हेगारी जगताशी जवळीक असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. सर्वसामान्य व्यक्तीने शस्त्र परवाना मिळावा यासाठी अर्ज केला तर त्याला सहजासहजी मिळत नाही, हे कोणी नाकारू शकत नाही. मात्र राजकीय हस्तक्षेप आला तर न होणारी गोष्ट काही वेळात होते. मात्र ज्या ठिकाणी जनतेच्या सुरक्षेचा प्रश्न येतो तेथे राजकीय नेतेमंडळींनी हस्तक्षेप करण्याआधी कायदा व सुव्यवस्थेसह सर्वसामान्य जनतेच्या सुरक्षा याचा विचार करणे गरजेचे आहे, तर अनब तरच गुन्हेगारी मोडीत काढण्याचे उद्दिष्ट सफल होईल, यात दुमत नाही. महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, र. धो. कर्वे, लोकमान्य टिळक यांच्यासारख्या महापुरुषांच्या कर्तृत्वाने बहरलेली महाराष्ट्र भूमी आहे. या भूमीत कर्मवीर यांच्यासारख्या महापुरुषांनी शिक्षणाचा प्रसार केला. या साऱ्या विचाराची कास धरत त्या पाऊलवाटेने मार्गक्रमण करणारे राज्य म्हणून महाराष्ट्राची जगभरात ओळख आहे. मात्र गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात गुन्हेगारीचा आलेख चढाच राहिला असून तो आजही कायम आहे. महाराष्ट्रात गुन्हेगाराला शिक्षा होत नाही असे नाही, फक्त त्या गुन्ह्याला वाचा फोडण्यासाठी कोणी तरी पुढाकार घेणे गरजेचे आहे. बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण शंभर टक्के गाडले गेले असते. परंतु प्रसारमाध्यमे, सोशल मीडिया यांनी हे प्रकरण लावून धरले आणि गुन्हेगार कारागृहापर्यंत पोहोचले. या घटनेनंतर बीड शांत होईल असे वाटत होते, परंतु तरुणाला बेदम मारहाणीचा व्हिडीओ व्हायरल झाला, दोन दिवसांपूर्वी महिलेला मारहाण केल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला. त्यामुळे बीड गुन्हेगारांचा अड्डा झालाय की काय, असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. बीडचे पालकमंत्री अजित पवार त्यामुळे बीड जिल्ह्यातून गुन्हेगारी संपुष्टात येईल, अशी आशा बाळगणे काही चुकीचे नाही. सध्या पुण्यातील गुंड निलेश घायवळ प्रकरणाची जोरदार चर्चा सुरू आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असताना पासपोर्ट मिळाला आणि विदेशात रवाना झाला. त्यानंतर त्याच्या घराची झाडाझडती घेतली असता दोन जिवंत काडतुसे सापडली आणि शस्त्र परवाना दिल्याचा मुद्दा उजेडात आला आहे. घायवळ याला शस्त्र परवाना गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या शिफारशीनुसार दिल्याचा आरोप विरोधकांनी केला. त्यानंतर योगेश कदम यांना घेण्याचा जोरदार प्रयत्न सुरू आहे. मात्र प्रश्न असा निर्माण होतो की, जनतेच्या कल्याणासाठी राज्यकर्त्यांना निवडून पाठवले जाते. मात्र राजकारणीच गुन्हेगारांचे हित जोपासत असल्याचे अनेक प्रकरणांत समोर आले आहे. राज्यकर्त्यांनी सामाजकारणावर भर दिल्यास महाराष्ट्र राज्य नक्कीच सुजलामब सुफलामब होण्यास वेळ लागणार नाही, हेही तितकेच खरे. महाराष्ट्राची भूमी थोर, संत, महापुरुषांची हे आता कुठे तरी काळाच्या पडद्याआड जात आहे. देशात गुन्हेगारी म्हटलं तर उत्तर प्रदेश बिहार या राज्यांचा उल्लेख प्रथम होत असे. अनेक गुन्ह्यांच्या आलेखात उत्तर प्रदेश बिहार ही राज्ये वरच्या क्रमांकावर होती, मात्र आता त्या राज्यांना मागे टाकत महाराष्ट्राने गुन्हेगारीत बाजी मारली की काय, अशी शंका निर्माण झाली आहे. महाराष्ट्रात गुन्हेगारी वाढीची अनेक कारणे असली तरी बेरोजगारी, आर्थिक चणचण, व्यसनाचे वाढते प्रमाण ही मुख्य कारणे आहेत. मात्र त्याहीपेक्षा म्हणजे राजकीय हस्तक्षेप वाढणे, मी काहीही केले तरी पोलिसांचा खाक्या अनुभवयास मिळणार नाही, काही महिन्यांत जामिनावर सुटका असा विश्वास गुन्हेगारामध्ये निर्माण झाला आहे. गुन्हेगार आणि राजकर्ते दोघांमधील मैत्रीची बेडी इतकी घट्ट आहे की, राज्यात नव्हे तर देशातून गुन्हेगारी संपुष्टात येणे अशक्य आहे. लोकप्रतिनिधी म्हटले की, सर्वसामान्य जनतेच्या समस्यांचे निवारण, प्रभागात सोयीसुविधा उपलब्ध करून देणार या विश्वासाने लोकप्रतिनिधीची निवड जनता करते. मात्र गेल्या काही वर्षांत राज्यातील राजकारणाचे समीकरण बदलले असून जनतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष आणि आरोप-प्रत्यारोप करण्यातच नेतेमंडळी धन्यता मानतात. निलेश घायवळ प्रकरणात शस्त्र परवाना दिला कोणी याचा शोध घेणे गरजेचे असताना आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत.

# ‘मानवाधिकार संरक्षण कायदा १९९३’

**हॅलो प्रभात**

भारताच्या घटनेने, प्रत्येक व्यक्तीला काही मूलभूत अधिकार दिले आहेत, कोणत्याही परिस्थितीत व्यक्तीच्या त्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन केले जाऊ शकत नाही. भारताच्या घटनेने, प्रत्येक व्यक्तीला काही मूलभूत अधिकार दिले आहेत, कोणत्याही परिस्थितीत व्यक्तीच्या त्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन केले जाऊ शकत नाही. जीविताचा, स्वातंत्र्याचा, समतेचा आणि सन्मानाने जगण्याचा हक्क प्रत्येक भारतीयाला असल्याचे घटना सांगते. या भारतीय संविधानासह अनेक आंतरराष्ट्रीय परिषदा आणि जागतिक समुदायाने असे हक्क मान्य केले आहेत. या हक्कांची पायमल्ली होत असेल तरी ती त्वरित रोखण्याचे हक्कसुद्धा भारतीय न्यायालयांना असतात आणि अशाच हक्कांना/अधिकारांना ‘मानवाधिकार’ म्हणून ओळखले जाते.

१९४८च्या मानवाधिकारच्या आंतरराष्ट्रीय परिषदांपासून इतरही अनेक महत्त्वाच्या मानवाधिकार संबंधित परिषदांवर, करारांवर आणि ठरावांवर भारत जागतिक समुदायाबरोबर ठामपणे उभा होता, मात्र भारतातील ‘मानवाधिकार उल्लंघन’ रोखण्यासाठी ठोस पावले उचलण्याची गरज प्रकर्षाने जाणवत होती.

भारत सरकारने त्यासाठी १२ ऑक्टोबर १९९३ मध्ये ‘मानवाधिकार संरक्षण कायदा १९९३’ संमत केला व त्यायोगे ‘राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची’ स्थापना झाली. या कायद्याद्वारे देशातील मानवाधिकाराची पायमल्ली रोखण्यासाठी आयोगाला स्वतंत्रपणे असे अनेक अधिकार बहाल करण्यात आले आहेत.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या त्या त्या राज्यात ‘राज्य मानवाधिकार आयोगा’चे कार्यालय असून सदर मानवाधिकार आयोगाकडे आपल्या मूलभूत हक्कांच्या तसेच मानवाधिकारांच्या उल्लंघनाबाबत आपण तक्रार करू शकतो. त्याची रीतसर चौकशी होऊन आयोग योग्य ते आदेश पारित करते. काही प्रसंगात आयोग स्वत:च मानवाधिकार उल्लंघनाची दखल घेते आणि योग्य ते निर्देश दिले जातात.

समाजामध्ये बालकांचे, स्त्रियांचे तसेच वृद्धांचे मानवाधिकार हनन आजही मोठ्या प्रमाणात होत आहे. आपल्या हक्कांबाबत जागृत होऊन याविरुद्ध आयोगाकडे दाद मागण्यास पुढाकार घ्यायला हवा. ज्येष्ठ नागरिकांनीही त्यांच्या हक्कांचे उल्लंघन होऊ नये, यासाठी जागरूक असले पाहिजे.

महाराष्ट्र मानवाधिकार आयोगाचे कार्यालय हे मुंबई येथे असून मानवाधिकार उल्लंघनाबाबत तेथे तक्रार करता येते. ही तक्रार लेखी स्वरूपात व्यक्तिश: अथवा टपालाने सुद्धा पाठविण्यात येऊ शकते. सर्वसामान्यांच्या सोयीसाठी व ई-गव्हर्नन्सचा भाग म्हणून आता राज्य मानवाधिकार आयोगाच्या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने सुद्धा तक्रार नोंदविली जाऊ शकते. राज्य मानवाधिकार आयोगाची विस्तृत माहिती तसेच तक्रारीसाठी http://www.mshrc.gov.in हे संकेतस्थळ तर राष्ट्रीय मानवाधिकार आयोगासाठी nhrc.nic.in हे संकेतस्थळ आहे.

### राष्ट्रीय मानवाधिकार आयोग पार्श्वभूमी

०१. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग एक असंवैधानिक आयोग आहे. १९९३ च्या मानवाधिकार कायद्यांतर्गत या आयोगाची १२ ऑक्टोबर १९९३ रोजी स्थापना करण्यात आली. २००६ साली या कायद्यात संशोधन करण्यात आले.

०२. हा आयोग संविधानाद्वारे व आंतरराष्ट्रीय कायद्याद्वारे निर्मित तसेच भारतात न्यायालयाने दिलेल्या जीवन, स्वतंत्रता, समता व व्यक्तिगत मर्यादा या संबंधीच्या अधिकाराचे संरक्षण करतो.

०३. आयोगाचे स्वरूप सल्लागार मंडळाप्रमाणे आहे. आयोग दोषींना शिक्षा देऊ शकत नाही किंवा पिडीताला सहाय्य देऊ शकत नाही. आयोग फक्त शासनाला सल्ला देतो तसेच दोषीला शिक्षेची व पिडीताला साहाय्य देण्याची शिफारस शासनाला करतो.

### आयोगाच्या स्थापनेचे उद्देश

०१. त्या संस्थांतर्गत व्यवस्थाना मजबूत करणे ज्याद्वारे मानवाधिकारांच्या मुद्द्यांचे पूर्ण रुपात समाधान केले जाऊ शकते. ०२. सरकारचे लक्ष मानवाधिकारांच्या रक्षेसाठी कायदे करण्याकडे वेधणे. ०३. व या कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न करणे.

### आयोगाची रचना

०१. हा एक बहुसदस्यीय आयोग आहे. यात एक अध्यक्ष व इतर ४ सदस्य असतात.




## १२ ऑक्टोबर : राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना

०२. अध्यक्ष हा सर्वोच्च न्यायालयाचा कोणताही सेवानिवृत्त मुख्य न्यायाधीश असावा.

०३. सदस्य: १ सर्वोच्च न्यायालयात कार्यरत किंवा सेवानिवृत्त न्यायाधीश, १ उच्च न्यायालयात कार्यरत किंवा सेवानिवृत्त न्यायाधीश, आणि इतर दोघांना मानवाधिकाराशी संबंधित माहिती, कार्यानुभव असणे आवश्यक आहे.

०४. या पूर्णकालीन सदस्यांशिवाय इतर ४ पदसिद्ध सदस्यही असतात. त्यात राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग, राष्ट्रीय महिला आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग या चारही आयोगाचे अध्यक्ष असतात.

०५. या आयोगात एक महासचिव असतो जो मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम पाहतो.

०६. आयोगाच्या अध्यक्ष आणि सदस्य यांची निवड राष्ट्रपती सहा सदस्यीय समितीच्या शिफारसीवरून करतात. या समितीचा अध्यक्ष पंतप्रधान असतो तर समितीमध्ये लोकसभेचा सभापती, राज्यसभेचा उपाध्यक्ष, संसदेच्या दोन्ही सभागृहातील विरोधी पक्षाचे नेते आणि केंद्रीय गृहमंत्री इत्यादी सदस्य असतात.

०७. सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयाच्या कार्यरत न्यायाधीशांची नियुक्ती सरन्यायाधीशांशी सल्लामसलत करूनच केली जाते.

०८. आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य ५ वर्षापर्यंत किंवा वयाच्या ७० व्या वर्षापर्यंत, जी अट आधी पूर्ण होईल तोपर्यंत पदावर कार्यरत राहतात. कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर अध्यक्ष वा सदस्यांना केंद्र आणि राज्य शासनाच्या अखत्यारीत नियुक्त करता येत नाही.

### आयोगाची कार्ये

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या अधिनियमाच्या कलम १२ मध्ये आयोगाची कार्ये व अधिकारांचे वर्णन दिलेले आहे.

०१. मानव अधिकाराच्या उल्लंघनाचा गुन्हा असलेल्या सरकारी कर्मचाऱ्याविरुद्ध आयोग चौकशी करू शकतो व दोषी आढळल्यास कारवाई करण्याबाबत संबंधित शासनाला शिफारस केली जाते.

०२. कोणत्याही न्यायालयात दाखल केलेल्या मानवाधिकार विवादात आयोग त्या न्यायालयाच्या परवानगीने हस्तक्षेप करू शकतो.

०३. राज्य सरकारच्या परवानगीने आयोग त्या राज्यातील कारागृहे, बंदिगृहे यांची पाहणी करू शकतो तसेच त्यासंदर्भात राज्य सरकारला सल्ला देऊ शकतो.

०४. मानवाधिकार आयोग नवीन अखिल भारतीय तुरुंग नियमावलिशी संबंधित शिफारसी देऊ शकतो.

०५. या आयोगाद्वारे मानवाधिकाराच्या रक्षणाच्या हेतूने कायदे, नियम व अभयपत्र इत्यादींवर पुनर्विचार केला जाऊ शकतो.

०६. मानवाधिकार आयोगाद्वारे आतंकवादी गतिविधि थांबविण्याच्या हेतूने सुधार-उपचारांची शिफारस सुध्दा केली जाते.

०७. या आयोगाद्वारे मानवाधिकाराशी संबंधित सर्व आतरराष्ट्रीय करार व वाटाघाटी लागू करण्यासाठी अध्ययन व त्यांना कार्यरूप देण्यासाठी प्रयत्नसुद्धा केले जातात.

०८. हा आयोग मानवाधीकारशी संबंधित शिक्षण आणि संशोधन इत्यादींना प्रोत्साहन देतो.

०९. समाजात अधिकार, साक्षरता व ज्ञानाचा प्रचार प्रसार तसेच त्याच्याशी संबंधित साहित्याच्या प्रकाशन व सहायतेसाठी हा आयोग योगदान उपलब्ध करून देतो.

१०. गैर-सरकारी संस्थाद्वारे मानवाधिकाराशी जुळलेल्या प्रयत्नांना राष्ट्रीय मानवाधिकार आयोग प्रोत्साहन देतो.

११. मे २००८ मध्ये भारतीय लष्कराद्वारे झालेल्या मानवी हक्काच्या उल्लंघन प्रकरणात अंतरिम आदेश देण्याचा अधिकार आयोगाकडे सुपूर्द आहे.

### आयोगाची कार्य पद्धत

०१. आयोगाचे मुख्य कार्यालय दिल्ली येथे असून आयोग भारतात कोठेही कार्यालय स्थापन करू शकतो. आयोगाला स्वतःची कार्यपद्धत नियमित करण्याचा अधिकार आहे.

०२. आयोगाला दिवाणी न्यायालयाप्रमाणे सर्व अधिकार आहेत. आयोग केंद्र आणि राज्य शासनाकडून किंवा दुय्यम अधिसत्तांकडून माहिती वा अहवाल मागवू शकतो.

मानवी हक्क उल्लंघनाची चौकशी करणारी आयोगाची स्वतःची स्वतंत्र संस्था आहे याशिवाय आयोग इतर कोणत्याही शासकीय संस्थेचा चौकशीसाठी वापर करू शकतो. एखादी घटना घडल्यानंतर आयोग १ वर्षाच्या आतच संबंधित प्रकरण हाताळू शकते.

०३. पिडीत व्यक्तीला तत्काळ अंतरिम मदत देण्याबाबत तसेच नुकसान भरपाई रक्कम अदा करण्याबाबत आयोग संबंधित शासनाला शिफारस करतो.

०४. आवश्यक निर्देशांकारिता आयोग सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयाकडे दाद मागू शकतो.

०५. आयोग आपला अहवाल केंद्र शासन किंवा संबंधित राज्य शासनाकडे सादर करतो.

## मिडवेस्ट लिमिटेडकडून आयपीओ किंमतपट्टा १,०१४ रु.-१,०६५ निश्चित

**हैदराबाद : वृत्तसंस्था**



ब्लॅक गॅलेक्सी आणि ॲब्सोल्युट ब्लॅक ग्रॅनाइटचे भारतातील सर्वात मोठे उत्पादक असलेल्या क्वार्ट्झ प्रोसेसर मिडवेस्ट लिमिटेडने ४५१ कोटी रुपये उभारण्यासाठी त्यांच्या आगामी प्रारंभिक सार्वजनिक ऑफरिंग (आयपीओ) साठी प्रति शेअर १,०१४-१,०६५ रुपये किंमतपट्टा निश्चित केला आहे. हा आयपीओ १५ ऑक्टोबर रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि १७ ऑक्टोबर रोजी बंद होईल. अँकर बुक १४ ऑक्टोबर रोजी उघडेल आणि २४ ऑक्टोबर रोजी सूचीबद्ध होणारे शेअर्स असतील.

## श्रेयस मीडियाची कार्निवल सुरू करण्याची तयारी

**मुंबई : हॅलो प्रभात**

श्रेयस मीडियाने आयोजित केलेल्या विजयवाडा उत्सवाने गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये आपले स्थान मिळवून जगातील सर्वात मोठा कार्निवल ठरल्याने जागतिक स्तरावर व्यापक लक्ष वेधले आहे. भारत, अमेरिका, कॅनडा आणि यूएईमध्ये ३,५०० हून अधिक कार्यक्रम यशस्वीरीत्या आयोजित करणाऱ्या या कंपनीने लाखो लोकांना एकत्र आणत आपल्या आयोजन क्षमतेचे प्रभावी प्रदर्शन केले आहे. आता श्रेयस मीडिया देशभरात बिहू, ओणम, गणेश चतुर्थी, पोंगल, लोहडी, दुर्गा पूजा आणि मकरसंक्रांती यांसारख्या सणांच्या निमित्ताने अशाच भव्य कार्निवलचे आयोजन करण्याची योजना आखत आहे.

## एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स फंड लाँच

**सांगली : हॅलो प्रभात**

एसयूडी लाइफ इन्शुरन्सने एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स फंड लाँच करण्याची घोषणा केली आहे, हा नवीन फंड ऑफर आहे जो निफ्टी अल्फा ५० इंडेक्सचा मागोवा घेते. सातत्याने चांगली कामगिरी करणाऱ्या शेअर्सची ओळख करून देणारा स्मार्ट बीटा बेंचमार्क आहे. नवीन फंड ऑफर ६ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर पर्यंत खुला आहे.

## संविधानाचे ‘अमृत महोत्सवी वर्ष’ विविध उपक्रमांनी साजरे होणार

**सांगली : हॅलो प्रभात**



भारतीय संविधानाला यंदा ७५ वर्षे पूर्ण होत असून, या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त भारतीय संविधान अमृत महोत्सव समिती, सांगली यांच्या वतीने वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांची माहिती समितीचे अध्यक्ष प्राचार्य बापूसाहेब माने यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महोत्सवाचे उद्घाटन १ नोव्हेंबर रोजी खासदार विशाल पाटील यांच्या हस्ते होणार असून, यावेळी पद्मश्री लक्ष्मण माने, किशोर गजभिये, जेबुनिसा शेख, गुलाब राठोड, आणि विनोद बागडे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. उद्घाटन कार्यक्रमात संविधानावरील विविध पुस्तकांचे प्रकाशन देखील होईल.

यानंतर २६ नोव्हेंबर संविधान दिन या दिवशी सांगली-मिरज-कुपवाड महापालिका क्षेत्रात मोटरसायकल रॅली आणि संविधान जागर जागृती व्याख्याने आयोजित केली जाणार आहेत. २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी, जिल्ह्यातील १०० शाळांमध्ये संविधान प्रतांचे वाटप करण्यात येणार असून, ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांना संविधानविषयक माहिती दिली जाईल. तसेच १४ ते १९ फेब्रुवारी दरम्यान ‘संविधान रथयात्रा’ जिल्ह्यात फिरणार असून, १९ फेब्रुवारी छ. शिवाजी महाराज जयंतीदिनी तिचा समारोप होईल. या सर्व उपक्रमांचा समारोप सोहळा ११ एप्रिल महात्मा ज्योतिबा फुले जयंतीदिनी आयोजित करण्यात आला आहे. या प्रसंगी समितीचे कार्याध्यक्ष युवराज शिंदे, आनंदराव कांबळे, गौतम शिंगे, रामहरी ठोंबरे, महेश भंडारे, मिलिंद वाघमारे, प्रकाश पाटील, अरुण कांबळे, संजू साबळे, अशोक मोहिते, शिवाजी कांबळे, अमोल होवाळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

हा वर्षभर चालणारा उपक्रम संविधान मूल्यांची जनजागृती, लोकशाहीचे बळकटीकरण आणि नागरिकांमध्ये संविधानाबद्दल अभिमान जागवण्याचा प्रयत्न करणार आहे.

## एसके हेअरड्रेसिंग स्कूल’चे प्रशिक्षण केंद्र सुरू

**मुंबई : हॅलो प्रभात**



भारतात केशकर्तनातील जागतिक दर्जाचे शिक्षण देण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या एसके हेअरड्रेसिंग स्कूलने आपले दुसरे प्रशिक्षण केंद्र आज मुंबईत सुरू केले. भारतीय सलून क्षेत्रातील कुशल व्यावसायिकांची कमतरता दूर करणे आणि शिक्षणाचा दर्जा वाढवणे हा एसके ब्यूटी रिसोर्सेस या कंपनीच्या पुढाकारातून सुरू झालेल्या या उपक्रमाचा उद्देश आहे. मुंबईतील नवे केंद्र महालक्ष्मी येथील टंटिया जोगानी इस्टेट या मध्यवर्ती परिसरात उघडण्यात आले आहे.

## पॉल मर्चंट्स ग्लोबल करन्सी कार्ड लाँच

**मुंबई : हॅलो प्रभात**

विविध वित्तीय सेवा प्रदान करणारी एक आघाडीची भारतीय कंपनी पॉल मर्चंट्सने मुंबईत झालेल्या प्रतिष्ठित ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२५ मध्ये पॉल मर्चंट्स ग्लोबल करन्सी कार्ड लाँच करून एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. मास्टरकार्डचे व्यवस्थापकीय संचालक रजनीश बन्सल; दक्षिण आशियातील प्रॉडक्ट्स आणि सोल्युशन्सचे वरिष्ठ उपाध्यक्ष रवी दाटला; आणि पाइन लॅब्सचे इश्युइंग बिझनेसचे अध्यक्ष आणि मुख्य व्यवसाय अधिकारी नवीन चंदानी यांनी या कार्डचे अनावरण केले. या प्रसंगी पॉल मर्चंट्स फायनान्सचे शैबू चेरियन आणि पॉल मर्चंट्स लिमिटेडचे रितेश वैद्य उपस्थित होते.

## सकरा वर्ल्ड हॉस्पिटलला मिळाली AACI मान्यता

**पुणे : हॅलो प्रभात**



सकरा वर्ल्ड हॉस्पिटल, कर्नाटकचे पहिले रुग्णालय बनले आहे ज्याला अमेरिकन ॲक्रेडिटेशन कमिशन इंटरनॅशनलकडून मान्यता प्राप्त झाली आहे. ही प्रतिष्ठित मान्यता सकराच्या नैदानिक उत्कृष्टतेची, रुग्ण सुरक्षेची आणि जागतिक दर्जाच्या आरोग्यसेवा पद्धतींच्या कटिबद्धतेची पुनःस्थापना करते.इंटरनॅशनल सोसायटी फॉर क्वालिटी इन हेल्थ केअर एक्सटर्नल इव्हॅल्युएशन असोसिएशनकडून मान्यता प्राप्त AACI हे सुनिश्चित करते की त्याचे मानक हे सर्वोच्च जागतिक निकषांनुसार असावेत आणि आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम पद्धतींनुसार सतत विकसित होत राहावेत.

## फेमची करवा चौथनिमित्त नवी मोहिम

**मुंबई : हॅलो प्रभात**

डाबर समूहाचा एक भाग असलेल्या भारतातील अग्रगण्य फेअरनेस ब्रँड ‘फेम’ने करवा चौथच्या निमित्ताने एक नवी मोहिम सादर केली आहे जी आजच्या काळातील प्रेम आणि नारीत्व साजरे करण्याच्या अर्थाला नव्याने परिभाषित करते. या मोहिमेत प्रसिद्ध ‘हसल फेम’ रॅपर अग्सी प्रमुख भूमिकेत झळकली आहे. ही फिल्म करवा चौथच्या पारंपरिक रीतिरिवाजांकडे एका ताज्या, आत्मविश्वासपूर्ण आणि आधुनिक दृष्टिकोनातून पाहते जिथे भक्तीचा संगम व्यक्तिमत्त्वाशी होतो आणि परंपरा काळाच्या ओघात नव्याने आकार घेताना दिसतात.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. ‘ए’, कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय** : ब्लॉक नं. ‘ए’, कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **सांगली शहर संपर्क :** ९०२१६५१९७६ ■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ निवासी संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर

मुंबई ■ सांगली ■ कोल्हापूर ■ नवे विचार...नवी सुरुवात ■ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : १९० ■ सोमवार, १३ ऑक्टोबर २०२५ ■ किंमतः ३ रुपये ■ पाने : ४+४







## संक्षिप्त...

### नगरपरिषद निवडणुकीत वंचितने फुंकले रणशिंग

हुपरी : हॅलो प्रभात

हुपरी नगर परिषदेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने वंचित बहुजन आघाडी कामाला लागली आहेत.पक्षाने उमेदवार उभे करण्याचे निश्चित केलेले असून इच्छुक उम ेदवारांनी वंचित बहुजन आघाडीला पसंती दिलेली आहे.

कोणत्याही परिस्थितीत आघाडीचा उमेदवार हा विजयी करायचाच असा निर्धार कार्यकर्त्यांनी केलेला आहे.

प्रभाग निहाय असणाऱ्या राखीव मतदारसंघांमध्ये तसेच ओबीसी मतदारसंघांमध्ये वंचित बहुजन आघाडी प्रामुख्याने जागा लढवणार हे चित्र आता हळूहळू स्पष्ट होत आहे.

# अनंत तरेंच ऐकलं असते तर शिवसेना फुटलीच नसती

## 'उबाठा' प्रमुख उध्दव ठाकरे यांना पश्चाताप

मुंबई : हॅलो प्रभात

शिवसेनेचे उपनेते,ठाण्याचे माजी महापौर दिवंगत अनंत तरे यांचं ऐकायला हवं होतं. त्यांचं ऐकलं असतं,तर शिवसेना फुटलीच नसती, आता पश्चाताप होत असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले, आता त्यांना पदं मिळाली आहेत. पण ज्यावेळी त्यांचा वापर संपेल, तेव्हा त्यांना कचराकुंडीत फेकून देण्यात येईल, तेव्हा मग कपाळावर हात बडवत तुम्हाला ते याच ठाण्यात दिसतील.

शिवसेनेतील सर्वात मोठ्या बंडानं २०२२ मध्ये संपूर्ण महाराष्ट्र हादरला. एकनाथ शिंदेंनी ४० आमदारांसह उद्धव ठाकरेंची साथ सोडत भाजपसोबत राज्यात सत्ता स्थापन केली. या बंडानंतर उद्धव ठाकरेंवर शिवसेना पक्ष नाव आणि धनुष्यबाण चिन्ह ही गमावण्याची वेळ आली. त्यानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हे नवं नाव आणि मशाल या चिन्हासह लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीला सामोरे जावे लागले.

शिवसेनेतील बंडानंतर पहिल्यांदाच उद्धव ठाकरेंनी सर्वात मोठं विधान केलं आहे. त्यांनी ठाण्यातील एका कार्यक्रमात पक्षफुटीवर पहिल्यांदाच पश्चातापाची भावना व्यक्त केली. ते म्हणाले, अनंत तरेंचं तेव्हाच ऐकायला हवं होतं.

आता मला पश्चाताप होतोय. तेव्हा तरेंचं ऐकलं असतं, तर शाहांसमोर हंबरडा फोडणारे बघायला मिळाले नसते, अशी टीकेची तोफ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर डागली. शिवसेनेचे नेते अनंत तरे यांच्या आयुष्यावर योगेश कोळी यांनी लिहिलेल्या 'अनंत आकाश' पुस्तक प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. शिवसेनेतील एकनाथ शिंदेंच्या बंडानंतर अनंत तरे यांचा




व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. या व्हिडिओत तरेंनी शिंदे यांच्या कार्यपद्धतीवर बोट ठेवलं होतं. त्यावेळी तरेंनी शिंदेंना आवरा असं उद्धवजींना सांगितल्याचं म्हटलं होतं. तसंच शिंदेंना आवरलं गेलं नाही, तर हा दुसरा नारायण राणे होईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली होती. पुढे उध्दव ठाकरे म्हणाले, मला पाश्चाताप आता होत आहे, तेव्हा अनंत तरे यांचे ऐकले असते, तर अमित शाह यांच्यासमोर वाचवा म्हणून घालीन लोटांगण घालणारे दिसले नसते. भाजपने जेव्हा २०१४ ला अचानक साथ सोडली, तेव्हा अनंत तरे हे ऐकायला तयार नव्हते. त्यांनी अपक्ष उमेदवारी भरली होती. मी त्यांना त्यावेळी मातोश्रीवर बोलावून भाजप आपल्याला संपवायला निघाला आहे, आधी त्यांना रोखू , मग आपण पुढे जाऊ असं सांगितलं होतं, पण तेव्हा तरे यांनी मला हा माणूस पुढे गद्दारी करणार असं सांगितलं होतं, आणि पुढे तेच झाले अशी टीकाही त्यांनी यावेळी केली.

तेव्हाचे ठाणे आनंद देणारे ठाणे होते, आताचे ठाणे कॉन्ट्रॅक्टरचे ठाणे झाले आहे, पण निष्ठेचे मुखवटे घातलेले लोक आपल्या बाजूला बसतात अशी जहाल टीकाही ठाकरे यांनी केली, तसेच त्यांनी आपल्या भाषणात आपल्यात अनंत तरेंसारखे राजहंस असते, तर कावळे फडफडले नसते असा टोलाही लगावला.

अनंत तरे यांनी त्यावेळी माझी नाराजी उद्धवजींवर नसून एकनाथ शिंदे ज्या पद्धतीनं काम करत आहेत, त्यांना पाहून मी उद्धवजींना सांगितलंय की, याला आवरा. या शिंदेला आवरा. नाही तर हा दुसरा नारायण राणे होईल. हा फक्त आपले आपले निवडतो. बाकी सगळ्यांना कामाला लावत असल्याची उद्विग्न भावना तरे यांनी व्यक्त केली होती. आपण जेव्हा रायगड लोकसभा लढवली, तेव्हा शिंदे नगरसेवक पण नव्हते असंही तरे यांनी म्हटलं होतं.

तसेच त्यांनी आता सगळे निर्णय ते एकटेच घेतात अशी टीका त्यांनी शिंदेंवर केली होती. या संघटनेतील निर्णय घेण्याचा अधिकार फक्त मातोश्रीला आहे. आधी तो माननीय बाळासाहेबांना होता, आता तो अधिकार उद्धवजींना आहे. आम्ही जर निर्णय घ्यायला लागलो,तर या संघटनेचे तुकडे तुकडे होणार अशी मोठी भीती तरेंनी उद्धव ठाकरेंकडे व्यक्त केली होती.

## डी.वाय.पी.मध्ये 'अत्याधुनिक करिअर डेव्हलपमेंट'



### डॉ.संजय डी.पाटील यांच्या हस्ते प्लेसमेंट विभागाचा शुभारंभ

कोल्हापूर : हॅलो प्रभात

डी.वाय. पाटील स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात अत्याधुनिक सोयी सुविधायुक्त करिअर डेव्हलपमेंट, प्लेसमेंट आणि आंतरराष्ट्रीय संबंध विभागाचे उद्घाटन डी. वाय. पाटील ग्रुपचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील यांच्या हस्ते झाले.

यावेळी विश्वस्त ऋतुराज पाटील आणि विश्वस्त पृथ्वीराज पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय गेल्या ४१ वर्षापासून गुणवत्तापूर्ण अभियांत्रिकी शिक्षणासाठी कार्यरत आहे. महाविद्यालयात विद्यार्थी केंद्रबिंदू मानून अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. सर्वोत्तम प्लेसमेंट रेकॉर्डसाठी ओळखल्या जाणाऱ्या या महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या करिअरच्यादृष्टीने सर्व सोयींनी युक्त असा अत्याधुनिक करिअर डेव्हलपमेंट, प्लेसमेंट आणि आंतरराष्ट्रीय संबंध विभाग सुरु केला आहे. नवीन उभारण्यात आलेल्या या विभागात १२४ विद्यार्थ्यांची क्षमता असलेली उच्च तंत्रज्ञानयुक्त कॉम्प्युटर लॅब, १२० आसनी वातानुकूलित सेमिनार हॉल, तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) तंत्रज्ञानावर आधारित चार मुलाखत कक्ष अशा अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. संजय डी. पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्पर्धेसाठी सक्षम बनविणे हे आमचे ध्येय आहे. या नव्या विभागतील आधुनिक सुविधा विद्यार्थ्यांच्या करिअर विकासासाठी भक्कम व्यासपीठ ठरतील.

ऋतुराज पाटील म्हणाले, प्रत्येक विद्यार्थ्याला चांगल्या कंपनीमध्ये उत्तम नोकरी मिळावी यासाठी आमची टीम नेहमीच प्रयत्नशील असते.

कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता म्हणाले, या अत्याधुनिक सुविधा विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी उपयुक्त ठरतील. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विद्यार्थ्यांचे कौशल्य अधिक विकसित होईल.

यावेळी डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा, कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले, सी. एच. आर. ओ. श्रीलेखा साटम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. चेडे, डॉ. महादेव नरके, डॉ. अजित पाटील, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार डॉ. एल. व्ही. मालदे, अधिष्ठाता (करिअर डेव्हलपमेंट अँड कॉर्पोरेट रिलेशन्स) प्रा. सुदर्शन सुतार, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर मकरंद काईगडे यांच्यासह विविध विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

# भाजपने साडी नेसवलेल्या 'मामां'ना काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी चक्क खांद्यावर घेतले

कल्याण : हॅलो प्रभात

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची एक वादग्रस्त प्रतिमा समाज माध्यमातून व्हायरल केल्याने भाजपा पदाधिकाऱ्यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ पदाधिकारी मामा पगारे यांना साडी नेसवत सत्कार केला होता, तर ज्येष्ठ व्यक्तीला अशी वागणूक दिल्याने याविरोधात गुन्हा दाखल व्हावा यासाठी काँग्रेस मागणी करत आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ कल्याणमध्ये होते.

त्यांनी मामा पगारे यांना खांद्यावर घेतले, त्यांचा सत्कार केला. भाषणात मामा यांनी पुन्हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विरोधात वादग्रस्त विधान केले. यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी भाजपा पदाधिकाऱ्यांनी केली आहे. यामुळे पुन्हा एकदा भाजपा आणि काँग्रेसमध्ये वाद पेटला आहे. डोंबिवलीतील काँग्रेसचे निष्ठावान आणि



ज्येष्ठ कार्यकर्ते मामा पगारे यांनी समाज माध्यमातून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची एक वादग्रस्त पोस्ट व्हायरल केली होती. त्यावरून भाजपाचे जिल्हाध्यक्ष नंदू परब, उपजिल्हाध्यक्ष संदीप माळी यांसह काही पदाधिकाऱ्यांनी पगारे यांना चक्क साडी नेसवत त्यांचा सत्कार केला होता.


पोलिसांना याप्रकरणी कारवाई करण्याचे निवेदन दिले होते, तर काँग्रेसचे पगारे यांनी याप्रकरणी भाजप पदाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न केला, मात्र टिळकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल न झाल्याने त्याचा निषेध करण्यासाठी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांच्या नेतृत्वाखाली कल्याण येथे पोलीस उपायुक्त कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. कार्यक्रमस्थळी प्रदेशाध्यक्ष सकपाळ आल्यानंतर व्यासपीठाजवळ त्यांनी मामा यांना अलगद खांद्यावर उचलून घेतले आपल्या निष्ठावान, सच्च्या कार्यकर्ता असलेल्या मामा यांना उचलल्यानंतर त्यांचे दोन्ही हात उंचावून काँग्रेस यांच्या पाठीशी ठामपणे आहे हे दाखविण्याचा प्रयत्न प्रदेशाध्यक्ष सकपाळ यांनी केला.प्रदेशाध्यक्षांची ही कृती पाहून सर्वच काँग्रेस नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते अवाक झाले. यावेळी जिल्हाध्यक्ष सचिन पोटे, नवीन सिंग यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. ब्लेझर गांधी टोपी घालून, भगवान गौतम बुद्ध यांची प्रतिमा आणि संविधानाची प्रत देऊन त्यांचा सत्कार केला. मामा पगारे यांच्या पाठीशी आपण सारे आहोत. त्यांच्यावरील अन्याय काँग्रेस पक्ष सहन करणार नाही. जोपर्यंत पगारे यांच्या प्रकरणात भाजप पदाथिकाऱ्यांवर अनुसूचित जाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याने गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यत काँग्रेस गप्प बसणार नाही, असा इशारा यावेळी प्रदेशाध्यक्ष सकपाळ यांनी दिला. निष्ठावान कार्यकर्त्याला बळ देण्यासाठी आणि त्यांच्या पाठीशी उभे राहण्यासाठी प्रदेशाध्यक्ष स्वतः कल्याणमध्ये आल्याने काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्त्यामध्ये उत्साह संचारला होता. भाजप निषेधाच्या घोषणा यावेळी काँग्रेस कार्यकर्त्यांकडून देण्यात आल्या.

# राज्याच्या राजकारणात नोव्हेंबरमध्ये 'उलथापालथ'

## खा.राऊतांचे भाकित

मुंबई : हॅलो प्रभात

महाराष्ट्राच्या राजकारणात नोव्हेंबर महिन्यात मोठी उलथापालथ होईल, असा दावा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे खा. संजय राऊत यांनी रविवार माध्यमांशी बोलताना केला. तसेच, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामतीमध्ये निवडणुका जिंकण्यासाठी 'घोटाळे' केल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला आहे.



यावेळी खा.राऊत म्हणाले की, महाराष्ट्राच्या राजकारणात नोव्हेंबर महिन्यात उलाथापालथ होईल. देशाचे सर्वोच्च न्यायालयात शिवसेना पक्षाचे नाव आणि चिन्हाबाबत खटला सुरु आहे. आम्हाला न्यायदेवता न्याय देईल आणि तो जर न्याय मिळाला तर राज्याच्या राजकारणात उलथापालथ होईल. दिल्लीमध्ये उलथापालथ करण्याची क्षमता महाराष्ट्राच्या नेतृत्वात पूर्वी होती, आता ती नाही. अशा शब्दांत त्यांनी सत्ताधारी पक्षाला टोला लगावला. यावेळी संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनाही लक्ष्य केले. अजित पवारांनी बारामतीमध्ये निवडणुका जिंकण्यासाठी घोटाळेच केले. रात्री पोलिसांच्या गाडीतून पैसे कसे वाटले गेले. बँका कशा उघड्या ठेवल्या त्याची लोकांना माहिती आहे.

मागील अडीच वर्षात सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी उद्धव ठाकरेंनी अनेक आंदोलने केली. त्यांचे डोळे फुटले आहेत का? का कानाचे पडदे फाटले आहेत. ते अमित शहा यांच्या कंपनीतले नोकर आहेत. यांची बेनामी कंपनी आहे. शिवसेना हा या महाराष्ट्रातला सर्वात पहिला क्रमांकाचा सर्वात मोठा विरोधी पक्ष आहे त्याची तुम्हाला भीती वाटते त्या भीती पोटी कुठेही वक्तव्य आहे, असे प्रत्युत्तर त्यांनी एकनाथ शिंदेंना दिले.


# सहा महिन्यांच्या मौनानंतर... वाघाची डरकाळी

## 'स्थानिक' साठी जिल्ह्याचे राजकारण भडकणार? ; पत्ते झाले खुले आता थेट लढत

सांगली : विशेष प्रतिनिधी

तब्बल सहा महिन्यांच्या प्रदीर्घ मौनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार पक्ष ) माजी प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना मन मोकळे केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील राजकारण भडकण्याची शक्यता राजकीय जाणकारांमधुन व्यक्त केली जात आहे.

जिल्ह्यातील राजकारणाने आता वेग घेतला असल्याचे दिसत असले तरी राजकीय पातळीवर सर्वच पक्षांमध्ये स्मशान शांतता पसरलेली आहे. महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद, नगरपंचायतींच्या निवडणूका एकापाठोपाठ एक होणार आहेत. शहरी आणि ग्रामीण भागातील जनतेच्या मनाचा कानोसा या निवडणुकांच्या माध्यमातून नंव्याने लागणार असून विधानसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीचा पराभव करून महायुतीने जो



विजय मिळवला तो नैसर्गिक होता की ॲक्सीडेंटल होता, याचा अंदाज 'स्थानिक' च्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लागणार आहे. त्या दृष्टिकोनातून सर्व राजकीय पक्ष तयारीला लागले आहेत. तरी कोणत्याच पक्षाला संघटित की स्वबळावर निवडणूक लढवायची याबाबतचे कोडे अद्याप सोडवता आलेले नाही.

सलग आठ वेळा विधानसभेच्या निवडणुका इस्लामपूर विधानसभा मतदारसंघातून जिंकणारे जयंतराव पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्षपद सात वर्षे भूषवले. या काळात राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद लक्षणीय वाढली.

पण नव्या दमाच्या नेतृत्वाला वाव देण्यासाठीच त्यांनी प्रदेशाध्यक्ष सोडले असे असले तरी पक्षांतर्गत त्याचप्रमाणे बाहेरील शत्रूंशी त्यांना एकाच वेळी तोंड द्यावे लागेल. प्रदेशाध्यक्षपद सोडल्यानंतर सहा महीने मौन बाळगून त्यांनी राजकीय वक्तव्य टाळले, परंतु आता मनमोकळेपणाने






प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये वेगळीच ऊर्जा निर्माण झालेली आहे.

जयंतराव पाटील यांनी मैदानात ताकदीने उतरण्याची अप्रत्यक्षरीत्या घोषणा केल्यामुळेच विरोधकांमध्ये चुळबूळ सुरू झालेली आहे. जयंतराव पाटील यांच्या मुत्सद्देगिरीचा आवाका त्यांच्या पक्षाच्या नेत्यांना आहे. त्याचप्रमाणे मित्रपक्षांनादेखील चांगल्या रीतीने आहे. त्यामुळेज्या पद्धतीने महाविकास आघाडीच्या राजकारणाची जुळवाजुळव व्हायला हवी, त्या पद्धतीने होत नाही असा तर्क राजकीय जानकार व्यक्त करत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जसजशा जवळ येऊ लागल्या आहेत, तस तसे राजकीय तापमान वाढू लागले आहे.

विधानसभा निवडणुकीत महायुतीने अबूतपूर्व यश मिळवल्यामुळे एक वेगळाच जोश त्यांच्यात निर्माण झाला असला तरी जयंतराव पाटील कधी कोणता खेळ करतील आणि संपूर्ण बाजीच पलटवून टाकतील याची धास्ती असल्यामुळेच भाजपच्या काही नेत्यांकडून अश्लाघ्य शब्दांमध्ये टीका केली जात आहे. प्रदेशाध्यक्षपद सोडल्यापासून पाटील यांनी आपले संपूर्ण लक्ष सांगली जिल्ह्यावर केंद्रित केले आहे महापालिका , जिल्हा परिषद, निवडणूक मित्रपक्ष असलेली काँग्रेस आणि ठाकरे सेनेला बरोबर घेऊन त्यांना गड ताब्यात घ्यायचा आहे.

मित्रपक्ष जयंतराव पाटील यांना कितपत साथ देतात यावर राजकारणाची दिशा ठरणार आहे. जयंतराव पाटील यांचा प्रचंड जनसंपर्क स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये त्यांना यशापर्यत घेऊन जाईल अशी दाट शक्यता राजकीय जाणकारांतून व्यक्त केली जात आहे.

महायुतीने अद्याप निवडणूक स्वबळावर की महायुती म्हणून लढायची यावर आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही तर महायुतीच्या राजकीय चालींवर महाविकास आघाडीचे नेते कावळ्यासारखी करडी नजर ठेऊन आहेत ही मात्र नक्की.



## थोडक्यात...

## जिल्ह्यातील १४ क्षयमुक्त ग्रामपंचायतींचा सन्मान



### आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर : कोल्हापूर जिल्हा क्षयमुक्त करणार

गारगोटी : हॅलो प्रभात

सन २०३० पर्यंत संपूर्ण भारत टी. बी. मुक्त करण्याचा केंद्र शासनाचा संकल्प आहे. याअंतर्गतच 'माझं कोल्हापूर क्षयमुक्त कोल्हापूर ' ही संकल्पना घेऊन संपूर्ण जिल्हा टी. बी. मुक्त करण्याचा संकल्प केला आहे. जिल्ह्यातील आजरा ,भुदरगड आणि राधानगरी तालुक्यातील ९४ ग्रामपंचायती या पूर्णतः क्षयमुक्त झाल्या आहेत. या ग्रामपंचायतीबरोब४रच संपूर्ण जिल्हा लवकरच क्षयमुक्त करण्यात येईल, असा विश्वास सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केला . येथील इंजूबाई सांस्कृतिक भवनात आयोजित ' टी. बी. मुक्त ग्रामपंचायत - २०२४' पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंत्री आबिटकर यांच्या हस्ते निक्षय पोषण आहार किटचे वाटप तसेच आजरा , राधानगरी व भुदरगड तालुक्यातील सुमारे ९४ ग्रामपंचायतीच्या सरपंचांचा महात्मा गांधी यांचा पुतळा, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. आरोग्यमंत्री आबिटकर म्हणाले, नागरिकांनी टी .बी .ची अनावश्यक भीती बाळगू नये. ९४ गावातील सरपंचांचा सत्कार झालेला सत्कार ही अत्यंत कौतुकाची व अभिमानास्पद बाब आहे. जिल्ह्यातील सर्व सरपंचांनी ग्रामविकासासाठी मतभेद विसरून एकत्रित येवून काम करावे. ग्रामविकास कार्याला आपण सर्वतोपरी सहाय्य करू. तसेच राज्यात, जिल्ह्यात योग संस्कृती वाढली पाहिजे. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आनंद वर्धन यांनी प्रास्ताविक केले. आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. दिलीप माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुद्ध पिंगळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रशांत वाडीकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. हर्षला वेदक, गटविकास सुभाष सावंत, डॉ. संदीप भंडारे, डॉ. शेखर जाधव, कल्याण निकम, डॉ. अमोल पाटील, शिवाजी चौगुले यांच्यासह विविध पदाधिकारी, आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

## आमणापूर ग्रामस्थांकडून पूरग्रस्तांना आधार



येळावी : हॅलो प्रभात

आपणही या मातीच काहीतरी देण लागतो ही सामाजिक बांधिलकी जपत आमणापूरकरांनी 'मदत नव्हे कर्तव्य' या स्लोगन खाली पूरग्रस्थ बांधवाना मदतीचा हात दिला. २०१९ व २०२१ साली कृष्णाकाठच्या महापुराचा फटका बसलेल्या सांगली जिल्ह्यातील आमणापूर (ता.पलूस) येथील ग्रामस्थांनी माणुसकी आणि सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला आहे. गावातील जेष्ठ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली तसेच युवकांच्या पुढाकाराने व दानशूर आमणापूर ग्रामस्थांनी पूरग्रस्त सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील दारफळ (सिना) तसेच केवड व उंदरगाव व परिसरातील वस्तीवरील गरजू लोकांना मोठी मदत केली आहे. २०१९ मध्ये आमनापूरकरांनी स्वतः पुराच्या संकटाचा अनुभव घेतला होता आणि त्यांना मिळालेल्या मदतीची जाणीव ठेवून त्यांनी गरजू पूरग्रस्तांसाठी मदतीचे आवाहन केले. या आवाहनाला आमणापूर ग्रामस्थांनी भरभरून प्रतिसाद दिला.युवकांनी या मदतीतून जीवनावश्यक १४ वस्तूंचा समावेश असलेले एकूण ६०० पेक्षा जास्त किट तयार केले. या मदतीमध्ये रोजच्या जीवनात अत्यन्त उपयोगी असणाऱ्या किराणा वस्तू, साड्या, लहान मुलींचे ड्रेस यासह इतर आवश्यक वस्तू देण्यात आल्या. आमणापूर मधील युवक कार्यकर्त्यांनी हे सर्व मदत साहित्य घेऊन माढा तालुक्यातील दारफळ (सिना ), केवड, उंदरगाव तसेच परिसरातील वस्तीवरील गरजू पूरग्रस्त नागरिकांना वाटप केले. हे वाटप करत असताना त्यांनी प्रत्येक घरोघरी जाऊन टोकन दिले व जास्तीत जास्त गरजू लोकांपर्यंत मदत पोहचवली. आमणापूर गावातील युवकांचे प्रभावी व अचूक संयोजन आणि दानशूर गावकऱ्यांच्या सक्रिय सहभागामुळे हा सामाजिक बांधिलकीचा उपक्रम यशस्वी झाला.

## शिक्षक आणि विद्यार्थी यांचा संगमच गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा पाया : दिगंबर काळे

मोडनिंब : संतोष पांढरे



रोपळे खुर्द (ता.माढा) येथे आयोजित पालक सभेत केंद्रप्रमुख दिगंबर काळे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाने उपस्थित पालकांना भावुक केले. शिक्षण हे केवळ पुस्तकापुरते मर्यादित नसून समाजाला नवी दिशा देण्याचे प्रभावी माध्यम आहे. मुलांच्या चुकांवर पांघरूण घालू नका, तर त्यांच्या घडणीत जबाबदारीने सहभागी व्हा, त्यांना योग्य दिशा दाखवा असे प्रतिपादन केंद्रप्रमुख दिगंबर काळे यांनी केले.काळे पुढे म्हणाले, माणसाची प्रगती आणि उन्नती ही शिक्षणावर अवलंबून असते. घराला आधार व गावाला भूषण वाटावा असा नागरिक घडवायचा असेल, तर पालकांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. मुलं चुकीच्या वाटेला जाऊ नयेत, यासाठी पालकांनी सजग राहावे. शाळेचा गुणात्मक दर्जा उंचावण्यासाठी पालक व शाळा व्यवस्थापन समिती यांनी एकत्र येऊन प्रयत्न करावेत. आम्ही शिक्षक म्हणून शिक्षण देण्यात कुठेही कमी पडणार नाही. शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांचा त्रिसूत्री संगमच गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा पाया असल्याचेही काळे यांनी नमूद करून शिक्षणातून सुसंस्कारित पिढी घडवण्याचे आवाहनही केले. या प्रसंगी पालकांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, राज्य पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक विठोबा गाडेकर हे कर्तव्यनिष्ठ, शिस्तप्रिय आणि शाळेला समर्पित आहेत. शिक्षक दिगंबर देवकर व आगरकर मॅडम यांच्या मेहनतीमुळे शाळेला नवी गती मिळाली आहे. दरम्यान, शाळा व्यवस्थापन समितीची निवड बिनविरोध पार पडली. अध्यक्षपदी आरती पाटील, तर उपाध्यक्षपदी पंढरीनाथ नाईकवाडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान करून उपस्थितांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक विठोबा गाडेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन दिगंबर देवकर यांनी मानले.

## एमआयटी एडीटी मानसिक आरोग्य दिन साजरा

### सेंट तेरेसा स्कूलमध्ये विद्यार्थ्यांकडून पथनाट्य सादर




लोणी-काळभोर : हॅलो प्रभात

एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च येथील विद्यार्थ्यांनी मानसिक आरोग्य दिनानिमित्त सेंट तेरेसा स्कूल, लोणी-काळभोर येथे मानसिक आरोग्याची संवेदनशीलता या विषयावर आधारित पथनाट्य सादर केले. शालेय विद्यार्थ्यांना भेडसावणारा मानसिक ताण, पालकांच्या अपेक्षा, अभ्यासाचा अतिरिक्त तणाव आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याशी संबंधित समस्यांवरील उपाय तसेच त्यांचे मानसिक आरोग्य चांगले राखण्यासाठी पालक व शिक्षक यांची भूमिका या विषयांवर या पथनाट्यातून महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला.विद्यार्थ्यांनी मानसिक आरोग्य टिकवण्यासाठी मोबाईलच्या वापरावर नियंत्रण ठेवणे, मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी उपयुक्त ठरणारे व्यायाम व प्राणायाम आदींची माहितीही या सादरीकरणातून देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणामुळे उपस्थित चिमुकल्यांमध्येही प्रचंड उत्सुकता निर्माण झाली.

सेंट तेरेसा स्कूलचे मुख्याध्यापक विनय सुकुल आणि उपमुख्याध्यापिका सॅलविना सुकुल यांचे या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विशेष सहकार्य लाभले. तसेच शाळेचा शिक्षकवर्ग, विद्यार्थी आणि स्कूल ऑफ एज्युकेशन अँड रिसर्चचे सर्व प्राध्यापक व छात्र-अध्यापकांनी या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष तथा प्र-कुलपती डॉ. मंगेश कराड आणि कुलगुरू डॉ. राजेश एस. यांच्या प्रेरणेने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. महेश चोपडे आणि अधिष्ठाता डॉ. प्रिया सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. डॉ. नीता म्हवाण यांनी कार्यक्रमाच्या समन्वयक म्हणून काम पाहिले.

## छत्रपती शिवाजी महाराज अखंड जगाचे प्रेरणास्थान : प्रसाद जोशी यांचे प्रतिपादन



नरंदे : उमेश पाटील

महाराष्ट्राच्या मातीचा इतिहास ओजस्वी आणि तेजस्वी आहे. इथल्या मातीला छत्रपती शिवाजी महाराजांचा अभिमान आहे. छत्रपती शिवाजी महाराज एक बहुआयामी एक व्यक्तिमत्व होते. त्यांच्या पराक्रमाच्या गाथा गौरवशाली आहेत. दूरदृष्टी, नियोजन, परोपकारवृत्ती अशा अनेक गुणांतून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण केले असे सांगून छत्रपती शिवाजी महाराजांच्या लढाई प्रसंग सांगितले . छत्रपती शिवाजी महाराजांचा विद्यार्थ्यांनी आदर्श घ्यावा असे प्रतिपादन केले. छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य फक्त भारतासाठी मर्यादित नसून ते जगाचे प्रेरणास्थान असल्याचे सांगितले. तसेच किल्ले संरक्षण, ऐतिहासिक वस्तूंची जोपासना, थोरांचा आदर्श घ्यावा असे सांगून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. संस्थापक अध्यक्ष प्रतापराव देशमुख म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराज आजच्या युवकांसाठी आदर्श आहेत. इतिहास समजून घ्यावा, आणि या इतिहासातूनच नवीन युवक घडावा असे सांगून सदरचे व्याख्यान विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यासाठी नक्कीच उपयोगी पडेल असा आशावाद व्यक्त केला. प्रसंगी स्व.शिवाजीराव देशमुखसो व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रसंगी मान्यवर यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक सहाय्यक शिक्षक यशवंत बोराटे यांनी केले आभार सहाय्यक शिक्षिका पी आर कुंभार यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहायक शिक्षिका सुश्मिता शिंदे यांनी केले. सदर व्याख्यान कार्यक्रमास संस्थापक अध्यक्ष मान.प्रतापराव देशमुखसो, शाळा समितीचे चेअरमन हर्षवर्धनदादा देशमुख , निवासी शिक्षण संकुलाचे अधीक्षक विजयसिंह देसाई , मुख्याध्यापक एस टी गावडे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मच्छिमारांना हवामानाची सूचना देण्याचे निर्देश

मुंबई : हॅलो प्रभात

भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या कुलाबा येथील प्रादेशिक हवामान केंद्रामार्फत दर गुरुवार किंवा शुक्रवारी महाराष्ट्रासाठी सात दिवसांचा हवामानाचा अंदाज जाहीर केला जातो. या अंदाजात कोकण किनारपट्टीवरील वादळी वाऱ्याची शक्यता आणि समुद्रातील परिस्थितीची माहिती दिली जाते. जिल्हा प्रशासनाने ही माहिती https://mausam.imd.gov.in/mumbai/ या संकेतस्थळावरून नियमितपणे मिळवून मच्छिमार, मच्छिमार सहकारी संस्था आणि नौका मालकांना कळवावी असे निर्देश देण्यात आले आहे.

## व्यावसायिक क्षेत्रामध्ये 'इंग्रजी भाषेचे महत्त्व' वर व्याख्यान संपन्न

कोल्हापूर : हॅलो प्रभात



आधुनिक युगात कोणत्याही व्यावसायिक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी इंग्रजी भाषेचे कौशल्य अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन सायबर कॉलेजच्या तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. सुनिता दलवाई यांनी विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित व्याख्यानात केले. बी.एस्सी. कॉम्प्यूटर सायन्स (एंटायर) व इंग्रजी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. दलवाई यांनी इंग्रजी ही केवळ भाषा नसून यशाची गुरुकिल्ली असल्याचे सांगून विद्यार्थ्यांना संवादकौशल्य व तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी इंग्रजीचे ज्ञान आवश्यक असल्याचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. माधुरी पवार यांनी केले, स्वागत प्रा. पल्लवी देसाई यांनी केले. आभार प्रदर्शन कु. भूमी चौगुले हिने केले. सूत्रसंचालन कु. श्वेता पाटील आणि कु.संकेत पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. डॉ.कविता तिवडे, डॉ.श्रुती जोशी, रजिस्ट्रार एस.के.धनवडे यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

## श्रीपतराव चौगुले कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे क्रीडा स्पर्धेत यश

### तीन खेळाडूंची आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड

पन्हाळा : हॅलो प्रभात



माळवाडी-कोतोलीयेथील श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात उत्तुंग यश संपादन करत महाविद्यालयाचा गौरव वाढविला आहे.

कॉलेजच्या कु. विशाल संभाजी फिरिंगे याने ६८ किलो वजन गटात रौप्य पदक, कु. दीपक पाटील याने ७९ किलो वजन गटात कांस्य पदक, तर कु. अथर्व इंगळे याने ६५ किलो वजन गटात कांस्य पदक पटकावले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर तिन्ही खेळाडूंची शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या यशासाठी खेळाडूंना ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. के.एस. चौगुले, संस्था सचिव शिवाजीराव पाटील, संचालक डॉ. अजय चौगुले, प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, तसेच शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संग्रामसिंह मोरे आणि श्रीकांत सांगावकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.खेळाडूंच्या या उत्कृष्ट यशाबद्दल महाविद्यालयीन परिसरात व कोतोली गावात सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## जनसुराज्य पक्षात पक्ष प्रवेशाचा ओघ सुरूच

### प्राध्यापक, पदाधिकाऱ्यांचा समित कदम यांच्या उपस्थितीत प्रवेश

मिरज : हॅलो प्रभात



मिरज येथे जनसुराज्य शक्ती पक्षात योगेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली लिंगनूर, कवलापूर, बेंळकी, सलगरे, मिरज येथील प्राध्यापक, शिक्षक, युवक, पदाधिकारी कार्यकर्ते, यांनी जनसुराज्य पक्षाचे प्रदेशाध्यक्ष समितदादा कदम यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला .

यापक्ष प्रवेशामध्ये प्रा. नवीन बिरादार, प्रा.राजन मेटकरी,प्रा.सुरेश बंडगर,प्रा. जितेंद्र मोरे, प्रा. सिद्राया चौगुले, प्रा.स्वप्निल कोरे, प्रा.शहाजी कुंडले, कपिल कुंडले, राहुल मोरे, अक्षय पवार,अक्षय कुंडले, प्रवीण हाके, प्रशांत मोरे, सौरभ मोरे, शुभम गावडे, प्राणंद पाटील यांचा समावेश आहे. यावेळी सेवासदनचे सर्वेसर्वा योगेश पाटील,ज्येष्ठ नेते महादेव अण्णा कुरणे, जिल्हाध्यक्ष आनंद सागर पुजारी, सांगली शहर जिल्हाध्यक्ष डॉ.पंकज म्हेत्रे, नाना घोरपडे ,संजय पाटील, ताहीर शेख, राजू सपकाळे उपस्थित होते.

## सामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी युवा विकास आघाडी मैदानात

पेठवडगाव : हॅलो प्रभात

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वारे वाहू लागले आहे.शहरांसोबतच ग्रामीण भागात देखील निवडणुकांचे वारे वाहू लागले आहे.कोल्हापूर जि.प.मतदार संघातीलआळते जिल्हा परिषद मतदार संघात सुद्धा वातावरण तापू लागलेले पाहायला मिळत आहे. इच्छुकांच्या गाठीभेटी,लोकसंपर्क व विविध कार्यक्रमांना हजेरी याचे प्रमाण वाढलेल दिसत आहे.त्याचप्रमाणे स्थानिक आघाड्याची यामध्ये प्रयत्न करताना दिसत आहेत. त्यातीलच एक म्हणजे सावर्डे व परिसरात कार्यरत असलेली व सर्वसामान्यांच्या पसंतीस उतरलेली 'युवा विकास आघाडी' ही देखील या निवडणुकीच्या तयारीला लागलेली पहायला मिळत आहे.लोकांच्या भेटी घेऊन आपली भूमिका मांडताना पहायला मिळत असून लोकांना आकर्षित करताना दिसत आहे. 'युवा विकास आघाडी सावर्डे' यांनी गावातील प्रस्थापित राजकारणाला पर्याय देत तरुणांनी एकत्र येऊन ग्रामपंचायत निवडणुकीत, सत्तेपर्यंत पोहचले नसले तरी, मोठे यश मिळवले होते. हाच धागा पकडून या आघाडीचा विस्तार वाढावा,सामान्यांचे प्रश्न सोडवणे आणि गावगाड्यातील लोकांना या प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने निवडणूक लढवण्याच्या तयारीत दिसून येत आहे.

## उद्योजकीय विचाराने तरुणपिढी सक्षम बनेल : प्रा. डॉ. मिलिंद हुजरे

तासगाव : हॅलो प्रभात



सध्याच्या स्पर्धात्मक युगात नोकरी मिळवणे आणि टिकवणे हे मोठे आव्हान बनले आहे. अशा परिस्थितीत, तरुण पिढीसाठी उद्योजकता हा एक उत्तम आणि सन्मानाचा मार्ग म्हणून समोर येत आहे.असे उद्गार प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे यांनी पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव येथे अंतर्गत गुणवत्ता आणि कक्ष आणि वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या वसंतसिद्धा आयुर्वेदिक उटणे च्या उद्घाटन प्रसंगी बोलताना काढले. पुढे ते म्हणाले वाणिज्य विभाग राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी विविध कौशल्यपूर्ण उपक्रम राबवत आहे अशा कौशल्यपूर्ण उपक्रमामुळे नक्कीच नवउद्योजक निर्माण होतील असे सांगितले व याप्रसंगी वाणिज्य विभागातील विद्यार्थिनी कु.सोनाली उफाडे हिने स्वतः सादरीकरण केलेल्या जाहिराती बद्दल तिचे कौतुक त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. अमोल सोनवले यांनी केले. तर आभार प्रा.गोरखनाथ पाटील यांनी मानले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.आण्णासाहेब बागल यांनी केले.डॉ.श्रुती परचुरे, प्रा.नेहा मोरे व प्रा. सुनीता यमगर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी वाळा पावडर, अनंत मुळा पावडर, गुलाब पावडर, साधा व सुगंधी कचोरा, संत्रा साल, आंबेहळद, मंजिष्ठा पावडर, रुद्र पावडर , नागरमोथा हे आयुर्वेदिक घटक वापरून उटणे तयार केले आहे. सदर कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ.जालिंदर यादव, डॉ. विनोदकुमार कुंभार, डॉ. अर्जुन वाघ, डॉ.रणजीत कुंभार, डॉ.शहाजी पाटील, प्रो.तातोबा बदामे यांसह महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी पक्ष अग्रभागी असलेला दिसेल : शिवाजीराव नाईक

शिराळा : हॅलो प्रभात



महाराष्ट्राचे कणखर उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकाना केंद्रबिंदू मानुन काम करत असल्यामुळे आज पक्षाची ताकद वाढत आहे.यापुढील काळात सर्वच निवडणुकांमध्ये सांगली जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी पक्ष अग्रभागी असलेला दिसेल असे प्रतिपादन राज्याचे राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष, माजी मंत्री शिवाजीराव नाईक यांनी केले.

शिराळा संपर्क कार्यालय येथे शिराळा विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी पक्षाच्या जिल्हा महिला कार्यकारणी मध्ये निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांच्या सत्कार करतेवेळी नाईक बोलत होते. तर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी उपाध्यक्ष रणधीर नाईक यांची प्रमुख उपस्थित होती.

सौ. नेहा नरेंद्र सूर्यवंशी यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा वकील संघटनेच्या संघटक पदी, सौ.रुपाली महेश शिंदे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सांगली जिल्हा महिला आघाडीच्या उपाध्यक्षपदी अनुसया आनंदराव पाटील यांची सांगली जिल्हा महिला आघाडीच्या सरचिटणीसपदी व सौ.सीमा प्रदीप कदम यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महिला आघाडीच्या शिराळा तालुका अध्यक्षपदी निवड झाली. या निवडीचे पत्र सांगली जिल्ह्याचे अध्यक्ष निशिकांत पाटील व सांगली जिल्ह्याच्या ग्रामीण महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ.साधना सिद्धार्थ कांबळे -धेंड्यांच्या हस्ते दोन दिवसापूर्वी वितरण करण्यात आले.

नाईक पुढे म्हणाले, सांगली जिल्ह्याला निशिकांत पाटील यांच्यासारखा स्वच्छ प्रतिमेचा कर्तबगार उच्च विचाराचा राष्ट्रवादी पक्षाला जिल्हा अध्यक्ष मिळाल्यामुळे ग्रामीण भागातील समर्पित व निरपेक्ष भावनेने काम करणाऱ्या आपल्या कार्यकर्त्याला पदाधिकारी म्हणून निश्चितपणे काम करण्याचा अभिमान असून संघटना वाढीस मोठा उपयोग होणार आहे.

रणधीर नाईक म्हणाले,माजी मंत्री शिवाजीराव नाईक यांच्या पाठीमागे जी कार्यकर्त्यांची फळी आहे ती अत्यंत निस्वार्थी भावनेने व प्रामाणिकपणे संघटन वाढीचे काम करत आहे.शिराळा मतदारसंघामध्ये शिवाजीराव नाईक यांचे कार्यकर्ते या पुढील काळात राष्ट्रवादी पक्षाच्या विचाराचे चित्र खऱ्या अर्थाने अधिक प्रगतशील दिशेने रेखाटण्याचे सुंदर काम करतील. या पुढील काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राष्ट्रवादी पक्षाला मोठे यश मिळवून देण्यासाठी कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन काम करणार असल्याचे सांगितले.

यावेळी संचालक रघुनाथ पाटीला, उत्तम निकम उत्तम डांगे, महेश पाटील, अर्जुन कुरणे,प्रदीप कदम, विजय महाडिक, वैभव कांबळे, महेश शिंदे, उत्तम पाटील,जावेद काझी, दादा सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते.

# कला रसिकांच्या साक्षीने 'द फोक आख्यान' उत्साहात

## संस्कृतीचा संगम सोहळा प्रतिकदादा पाटील यांच्या पुढाकाराने संपन्न

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

कला रसिकांच्या विक्रमी गर्दीच्या साक्षीने येथील मा.जयंत पाटील खुल्या नाट्यगृहात लोककला आणि लोक संस्कृतीचा जागर करणारे द फोक आख्यान मोठ्या उत्साहात पार पडले. गण,छत्रपतींच्या स्वराज्याचे तोरण, वाघ्या मुरळीची गाणी, जात्यावरची गाणी, धनगरी ओव्या, गोंधळ आणि त्याला हलगी-घुमके,टाळ-ढिमडी, विणा-मृदंग,ढोल-तासे, ढोलकी, डफ अशा रन वाद्यांच्या अविट तालाची साथ असा हा ऊर्जा, शक्ती आणि संस्कृतीचा अनोखा संगम सोहळा युवा नेते प्रतिकदादा पाटील यांच्या पुढाकाराने संपन्न झाला. माजी मंत्री आ. जयंतराव पाटील,युवा नेते प्रतिकदादा




पाटील, तसेच राजारामबापू समूह आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी आणि खचाखच भरलेल्या नाट्यगृहाने हे आख्यान पाहिले, ऐकले आणि अनुभवले.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, लोकनेते राजारामबापू पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन आणि दीप प्रज्वलन करण्यात आले. मराठमोळ्या,लोककलेच्या आणि संस्कृतीच्या नऊ प्रकारच्या लोक गीतांना आणि कथांना जोडणारा हा सोहळा ठरला.

शेवटची शिलांगणाची माळ गुंफताना लमान बंधूने व्यक्त केलेली खंत, कलारसिक अंतर्मुख करणारी ठरली. यावेळी आ. पाटील म्हणाले,आपण जगाचे अनुकरण करताना लोककला आणि संस्कृती विसरत चाललो आहे. आपली लोककला आणि संस्कृती गतप्राण होत चालली आहे. आता लोककला आणि संस्कृतीची तिरडी सजवायची का परडी, हे तुमच्या हातात आहे. काही वेळा मराठी भाषेला समृद्धीचा साज चढविणारी कोडी घालून कला रसिकांना बोलते करण्यात आले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, मात्र १८ हजार जिल्हा परिषद शाळा बंद केल्या आहेत. त्याचे काय? असा प्रश्नही करण्यात आला.

पी.आर.पाटील,प्रा.शामराव पाटील, देवराज पाटील,विजयराव पाटील, बाळासाहेब पाटील,संजय पाटील, संग्राम फडतरे,माणिक पाटील, शशिकांत पाटील,विशाल शिंदे, अरुणादेवी पाटील,सुस्मिता जाधव, सुनिता देशमाने, आनंदराव मलगुंडे, सुरेंद्र पाटील,आनंदराव नलवडे, बाळासाहेब पवार, सुभाषराव सुर्यवंशी,खंडेराव जाधव,संदीप पाटील यांच्या सह हजारो कलारसिक या आगळ्या-वेगळ्या आख्यानाचे साक्षीदार ठरले.

### जयंत उडानचा शुभारंभ

**आ.जयंतराव पाटील यांच्या हस्ते,युवा नेते प्रतिकदादा पाटील यांच्या अविरत कष्टातून साकारलेल्या जयंत उडानया वेब साईटचा शुभारंभ करण्यात आला. समाजातील विविध घटकातील युवकांना नोकरी मिळविणे आणि व्यवसाय करण्यास या वेब साईटचा मोठा आधार मिळणार असल्याचे आ.पाटील यांनी यावेळी सांगितले.**



# रिजनल टिचर्स ऑर्गनायझेशन च्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार

**कवठेमहांकाळ : हॅलो प्रभात**

रिजनल टिचर्स ऑर्गनायझेशन दापोली यांच्या वतीने सांगली जिल्हासाठीचे आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा दांडेकर हॉल सांगली येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.यावेळी शिक्षक,पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.अशी माहिती जिल्हा सचिव सौ रुपाली पाटील तथा प्राचार्या परफेक्ट इंग्लिश स्कूल कुची (ता.कवठेमहांकाळ) यांनी कुची येथे दिली.

यावेळी संपुर्ण जिल्हातील ३५ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.सदर शिक्षकांचे शैक्षणिक उपक्रम, सामाजिक सहभाग व शैक्षणिक उपक्रमशीलता आशा विविध निकषानुसारच निवड करुन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

यावेळीप्रमुखपाहुणे आटपाडी येथील श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयाचे माजी प्राचार्य अँड विजय लोंढे,संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय काशिद,राष्ट्रीय कार्याध्यक्ष संजय खटके, महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष केदार कोळी, जिल्हा उपाध्यक्ष कृष्णदेव पाटील, जिल्हा सचिव सौ रुपाली पाटील,जिल्हा सल्लागार वासंती माळी,धनंजय शिंदे,शरद पाटील, चंद्रकांत शिंदे, राजेंद्र कांबळेसह शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दलित महासंघ व बहुजन समता पार्टीची विभागीय बैठक संपन्न

**उमदी : हॅलो प्रभात**

महाराष्ट्रातील दलित आणि बहुजन चळवळीमध्ये सर्वमान्य असलेल्या दलित महासंघ व बहुजन समता पार्टीच्या कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी यांची कोल्हापूर येथे विभागीय बैठक संपन्न झाली. दलित महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.प्रा.डॉ.मच्छिंद्र सकटे यांच्या अध्यक्षतेखाली व दलित महासंघ महाराष्ट्र राज्य अध्यक्ष काशिनाथ सुलाखे-पाटील, राज्य महिला आघाडी अध्यक्ष प्रा. पुष्पलता सकटे, राष्ट्रीय सरचिटणीस उत्तम चांदणे, महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष प्रकाश वायदंडे, बहुजन समता पार्टीचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष



वसंतराव सकट, महाराष्ट्राचे उपाध्यक्ष शंकर महापुरे, महाराष्ट्र राज्य सरचिटणीस अजित भोरे, राज्य उपाध्यक्ष सखाराम रणपिसे व राजाभाऊ खिलारे, अध्यक्ष, पश्चिम महाराष्ट्र, दलित महासंघ संजय केंगार सांगली जिल्हा उपाध्यक्ष, तुकाराम वालिकर, सिद्राम बिरूनगी, सतिष अजमाने या मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ही बैठक झाली. या मध्ये अनुसूचित जाती उपवर्गीकरण, मातंग आणि दलित समाजावर होणारे वाढत्या अत्याचार तसेच येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक या संदर्भात चर्चा, विचारविनिमय झाली.यावेळी कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनीही मार्गदर्शन केले.

# 'सोनहिरा'चा रू.८० प्रमाणे हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग

**सांगली/वांगी : हॅलो प्रभात**

डॉ. पतंगराव कदम सोनहिरा सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२४-२५ गळीत हंगामात गळीतास आलेल्या ऊसास प्र.मे.टन रुपये ३२००/- प्रमाणे यापूर्वी दर अदा केलेला आहे. तसेच दिपावलीकरिता प्र.मे.टन रू. ८०/- प्रमाणे ऊस बिल शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग केले आहे. त्याप्रमाणे प्र.मे.टन रु ३२८०/- प्रमाणे अंतीम उस दर होत आहे. तसेच दिपावलीकरिता सन २०२४-२५ गळीत हंगामात ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रतिटन ५०० ग्रॅम प्रमाणे सवलतीच्या दरात साखर दि. ११/१०/२०२५ ते ३०/१०/२०२५ या कालावधीत संबंधीत गटावर वाटप करणार आहे.



तसेच कमचाऱ्यांना दिपावलीकरिता १६.६६% प्रमाणे बोनस देत आहोत. अशी माहिती कारखान्याचे चेअरमन वनश्री मोहनराव कदम यांनी दिली. कारखाना गळीतासाठी सज्ज करण्यात आला आहे. चालू हंगामात कारखान्याने १३ लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ठ ठेवले आहे. ऊस तोडणीसाठी २८४ चारचाकी, १२० अंगद, १६३६ बैलगाडी व १० हार्वेस्टिंग मशिन कारखान्याकडून सज्ज करण्यात आलेल्या आहेत.

# मराठी भाषा समृद्ध होणे गरजेचे : वैशाली महाडिक

**सांगली/विटा : हॅलो प्रभात**

आपली महाराष्ट्रीय संस्कृती भारतातच नव्हे तर जगात सर्वश्रेष्ठ असून आपल्या मातृभाषेमुळेच श्रेष्टत्व प्राप्त झाले असलेने येणाऱ्या काळात जर संस्कृती अबाधित ठेवायची असेल तर आपली मायमराठी समृद्ध होणे गरजेचे आहे असे मत सौ. वैशाली महाडिक यांनी व्यक्त केले. बळवंत कॉलेजचे प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली ज्युनिअर विभागात आयोजित केलेल्या ङ्कमराठी भाषा दिन सप्ताह समारोप प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी कला विभाग प्रमुख अजित साळुंखे, दिलीप जाधव, सविता बनसोडे उपस्थित होते.




सौ. महाडिक पुढे म्हणाल्या, आपल्या मराठी भाषेला अभिजात मराठी भाषेचा दर्जा मिळाल्याने आपली मराठी भाषेविषयीची जबाबदारी अधिकच वाढल्याने आजच्या डिजिटल युगातही तिची परंपरा कायम ठेवण्यासाठी आजच्या तरुणाईने महान ग्रंथांनाच गुरु मानून वाचन संस्कृती चळवळ उभी करून भाषेची ही समृद्ध परंपरा जपली जावी असे आवाहन केलेलं.

यावेळी मराठीत बोलण्याची मराठीत वाचण्याची आणि मराठीत लिहिण्याची प्रतिज्ञा उपस्थितांना दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप जाधव यांनी केले. सूत्रसंचालन राम मुजमुले यांनी तर आभार नामदेव गुडघे यांनी मानले. कार्यक्रमास संतोष कदम , वैशाली जाधव, रुपाली बाबर, निलोफर मुलाणी, स्नेहल कदम यांच्यासह सर्व सेवक वृंद तसेच बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# प्रशस्त जागेमुळे नगरपालिकेच्या कामकाजाला गती मिळेल

## अमरसिंह पाटील

**शिरोळ : संदीप इंगळे**

शिरोळ नगरपालिकेचे कामकाज ग्राम पंचायतीच्या जुन्या इमारतीत सुरू असल्याने नागरिकांची प्रचंड गैरसोय होत होती.या अडचणीचा गांभीर्याने विचार करून महसूल मंत्री यांच्याकडे शिरोळ येथील जुने तहसील कार्यालयाच्या इमारतीसह ६२ गुंठे जागा नगरपालिकेला हस्तांतरित करण्याची मागणी केली होती.त्या मागणीला आज मूर्त स्वरूप मिळाले असून या प्रशस्त जागेमुळे कामकाज सुलभ आणि नागरिकांचा वेळ सुद्धा वाचणार असून शहराचे विकासाला गती मिळेल, असे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष अमरसिंह पाटील यांनी व्यक्त केले.शिरोळ येथील जुन्या तहसील कार्यालयाची इमारतीसह ६२ गुंठे जागा नगरपालिकेतले हस्तांतरणाचा समारंभ संपन्न झाला, यावेळी राजेंद्र पाटील यड्रावकर यांची प्रमुख उपस्थिती होती.शिरोळ शहरासाठी नवीन निर्माण झालेल्या नगरपालिकेच्या कामकाजाला गेल्या काही महिन्यांपासून जागेच्या अभावामुळे मोठी अडचण येत होती.



नगरपालिकेचे कामकाज ग्रामपंचायतीच्या इमारतीत सुरू असल्याने जागेची कमतरता आणि सोयीसुविधांचा अभाव यामुळे प्रशासनाचे कामकाज विस्कळीत होत होते.नागरिकांनाही त्यांच्या दैनंदिन कामांसाठी अडचणींचा सामना करावा लागत होता.या परिस्थितीची दखल घेत राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला.त्यांच्या या प्रयत्नांना यश मिळत महसूल विभागाने जुने तहसील कार्यालयासह ६२ गुंठे जागा शिरोळ नगरपालिकेला वापरासाठी हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला.महसूल विभागाने त्याबाबतचे आदेश जारी केले असून,या जागेचा हस्तांतरण सोहळा आज पार पडला.या निर्णयामुळे शिरोळ नगरपालिकेला स्वतंत्र इमारत व प्रशस्त जागा उपलब्ध होणार आहे.त्यामुळे प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ, नियोजनबद्ध आणि पारदर्शक होईल. नागरिकांना एकाच ठिकाणी सर्व शासकीय सेवा मिळू शकतील,ज्यामुळे त्यांच्या वेळेची आणि श्रमांची बचत होणार असून भविष्यात सदरची जागा नगरपालिकेकडे वर्ग करून नगरपालिकेची सुसज्ज इमारत बांधण्यात येणार असल्याचे सांगितले. याप्रसंगी प्रशासक तथा मुख्याधिकारी अजित नरळे, अमरसिंह पाटील, बाबा पाटील, विजय देशमुख, बजरंग काळे, संभाजी भोसले, अमर शिंदे, शिवाजीराव देशमुख यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'राजारामबापू'चे शेतकऱ्यांच्या खात्यावर ८ कोटी ३७ लाख वर्ग : प्रतिकदादा पाटील

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याच्या साखराळे, वाटेगाव-सुरूल व कारंदवाडी युनिटकडे गळीत हंगाम सन २०२४-२५ मध्ये गाळपास आलेल्या ऊसा पोटी दिवाळी सणासाठी एकूण रुपये ८ कोटी ३७ लाख ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर शुक्रवारी वर्ग केले आल्याची माहिती राजारामबापू साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रतिकदादा पाटील यांनी दिली.



माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या साखर कारखान्याने गळीत हंगाम २०२४-२५ मध्ये १३ लाख ७२ हजार २८१ मेट्रीक टन ऊसाचे गाळप केलेले आहे. यामध्ये साखराळे युनिटमध्ये ६ लाख ७३ हजार ४३२,वाटेगांव-सुरूल युनिट मध्ये ३ लाख ९८ लाख ५९३, कारंदवाडी युनिटमध्ये ३ लाख २५५ मेट्रीक टन ऊसाचे गाळप केलेले आहे.

साखराळे,वाटेगाव-सुरूल व कारंदवाडी युनिटकडे गाळपास आलेल्या ऊसास पहिला हप्ता प्रतिटन रुपये ३ हजार २०० प्रमाणे एकूण रक्कम रुपये ४३९ कोटी १२ लाख इतकी रक्कम ऊस बिलपोटी आदा केलेली आहे. सध्या दिवाळी सणासाठी ८ कोटी ३७ लाख रुपये ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग केलेले आहेत.

कारखान्याच्या साखराळे, वाटेगाव- सुरूल, कारंदवाडी व तिप्पेहळ्ळी-जत युनिटमध्ये ऑफ सिझनची कामे गतीने सुरू आहेत.

चारही युनिट शासनाने निश्चित केलेल्या तारखेस सुरू करीत आहोत. आपण गळीत हंगाम सन २०२५-२६ करिता साखराळे युनिटमध्ये ९ लाख ५० हजार,वाटेगाव-सुरूल युनिटमध्ये ५ लाख ५० हजार,व कारंदवाडी युनिटमध्ये ४ लाख ५० हजार,तिप्पेहळ्ळी-जत युनिटमध्ये ३ लाख ५० हजार असे एकूण २३ लाख मेट्रीक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट निश्चित केलेले आहे.

तरी ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपला सर्व ऊस आपल्या कारखान्यास पाठवून सहकार्य करावे,असे आवाहन प्रतिकदादा पाटील यांनी केले आहे. याप्रसंगी उपाध्यक्ष विजयराव पाटील, संचालक देवराज पाटील,प्रदीपकुमार पाटील,कार्तिक पाटील,विठ्ठल पाटील, कार्यकारी संचालक आर.डी.माहुली,चिफ अकौंटंट संतोष खटावकर प्रामुख्याने उपस्थित होते.

# अनंतराव पवार अभियांत्रिकीत लॉन टेनिस स्पर्धा उत्साहात



**पुणे : हॅलो प्रभात**

येथील अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग अँड रिसर्च या महाविद्यालयामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे शहर विभागीय क्रीडा समिती यांच्या समन्वयाने आंतर महाविद्यालयीन लॉन टेनिस (मुले) या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांचे उद्घाटन महाविद्यालयाचे आय क्यू ए सी समन्वयक प्रा. गणेश कोंढाळकर व ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा. दिगंबर पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धांमध्ये मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ कॉमर्स ने विजेतेपद पटकावले तर बृहन महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाने उपविजेतेपद पटकावले तसेच चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयाने तृतीय क्रमांक पटकावला. तृतीय क्रमांकाच्या लढतीमध्ये पी व्ही जी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग च्या खेळाडूंची लढत अपुरी पडली त्यामुळे त्यांना चतुर्थ स्थानावरती समाधान मानावे लागले. या स्पर्धा पार पाडण्यासाठी पुणे शहर विभागीय क्रीडा समितीच्या वतीने प्रा. डॉ. मोहन अमृळे प्रा. डॉ. आशा बेंगळे व डॉ. सुशील शिंदे यांनी सर्व स्पर्धांचे काटेकोरपणे नियोजन केले. या स्पर्धांसाठी प्रा.अमित गिरीगोसावी, डॉ. नामदेव बन्ने, प्रा. शेलार, महेश रेउर व आरजी टेनिस अॅकॅडमीचे रोहन गिडे व दिनेश गिडे इत्यादी उपस्थित होते. या स्पर्धेला पुणे शहरातील विविध महाविद्यालयातून खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता.

# उमळवाड स्मशानभूमीची दुरवस्था

## प्रशासनाचे दुर्लक्ष : मालवाहू गाडीच्या दिव्यांमध्ये करावा लागला अंत्यविधी

**जयसिंगपुर : हॅलो प्रभात**

उमळवाड, ता. शिरोळ: उमळवाड (तालुका शिरोळ, जिल्हा कोल्हापूर) येथील सार्वजनिक स्मशानभूमीची गेल्या अनेक वर्षांपासून दयनीय अवस्था झाली आहे. स्मशानभूमीचे शेड जीर्ण झाले असून, विशेषतः रात्रीच्या वेळी अंत्यविधीसाठी अत्यंत आवश्यक असलेली विजेची (लाईटची) कोणतीही सोय येथे उपलब्ध नाही. या गंभीर समस्येकडे ग्रामपंचायत आणि प्रशासनाचे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा संताप ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.




या अनास्थेमुळे उमळवाड ग्रामस्थांना अत्यंत वाईट अनुभव घ्यावा लागला. दि. १० ऑक्टोबर २०२५ रोजी रात्रीच्या सुमारास गावातील एका व्यक्तीचे निधन झाले. नियमानुसार, रात्री उशिरा त्यांचा अंत्यविधी करण्यासाठी ग्रामस्थ स्मशानभूमीत जमले. मात्र, येथे विजेची कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे सर्वत्र अंधार होता. अखेरीस, नाईलाजाने ग्रामस्थांना अंत्यविधीचे विधी पूर्ण करण्यासाठी एका मालवाहू (टेंपो अथवा पिकअप) गाडीच्या दिव्यांचा आधार घ्यावा लागला. मानवी दुःखाच्या क्षणी प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे झालेली ही गैरसोय अत्यंत चीड आणणारी आहे.

ही समस्या नवीन नाही. स्मशानभूमीची दुरुस्ती, नवीन शेडची उभारणी आणि विजेची सोय करण्याबद्दलचा विषय ग्रामसभेमध्ये अनेकवेळा वारंवार मांडण्यात आला आहे. ग्रामस्थांनी तोंडी आणि लेखी निवेदनाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, वारंवार मागणी करूनही सार्वजनिक स्मशानभूमीच्या दुरुस्तीचे काम अथवा नवीन शेड उभारणीचे काम अद्याप झालेले नाही. उमळवाड ग्रामस्थांनी प्रशासनाला आणि लोकप्रतिनिधींना तातडीने याकडे लक्ष देऊन, स्मशानभूमीची दुरुस्ती करावी, नवीन शेडची उभारणी करावी आणि तातडीने विजेची व्यवस्था करावी, अशी तीव्र मागणी केली आहे. भविष्यात अशा प्रकारे दुःखाच्या प्रसंगी गैरसोय होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

## डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीदिनी 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्याचे शासनाचे निर्देश

**मुंबई : हॅलो प्रभात**

वाचन संस्कृती वाढीस लागावी तसेच मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, विकास, जतन आणि संवर्धन व्हावे, या उद्देशाने माजी राष्ट्रपती स्व. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीदिनी म्हणजे १५ ऑक्टोबर रोजी ङ्गवाचन प्रेरणा दिनङ्ख म्हणून साजरा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. ङ्गघेऊ या एकच वसा, मराठीला बनवूया ज्ञानभाषाङ्ख ही यावर्षीच्या उपक्रमाची मध्यवर्ती संकल्पना आहे. राज्य शासनाचे सर्व मंत्रालयीन विभाग तसेच त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/मंडळ, सार्वजनिक उपक्रम, सर्व आयुक्त आणि सर्व जिल्हाधिकारी कार्यालये हे ङ्गवाचन प्रेरणा दिनङ्ख साजरा करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करणार आहेत. यामध्ये ऑनलाईन तसेच प्रत्यक्षरित्या कार्यक्रम आयोजित करण्यात येतील.



या कार्यक्रमांच्या आयोजनासाठी महाराष्ट्र साहित्य परिषद, मराठवाडा साहित्य परिषद, विदर्भ साहित्य संघ, कोकण मराठी साहित्य परिषद, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा आणि मुंबई मराठी साहित्य संघ यासारख्या साहित्य संस्थांची मदत घेतली जाणार आहे. ग्रंथालये, महाविद्यालये, तंत्रमहाविद्यालये, पदविका संस्था या ठिकाणी कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारितील संबंधित संस्था देखील वाचन संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करणार आहेत. त्याचबरोबर महापालिका/ नगरपालिका यांच्या अखत्यारितील संस्था देखील विविध कार्यक्रमांचे आयोजन करणार आहेत, असे मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी सांगितले आहे.

# नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'प्रधानमंत्री धन-धान्य कृषी' योजनेचा शुभारंभ

## मंत्री दत्तात्रय भरणे; शेतकऱ्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न

**पुणे : हॅलो प्रभात**

'प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजने'चा शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भारतरत्न सी. सुब्रमण्यम सभागृह, पुसा, नवी दिल्ली येथून दूरदृष्यप्रणालीद्वारे झाला. प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजनेत राज्यातील ९ जिल्ह्यांची निवड झाली असून केंद्राच्या व राज्य शासनाच्या योजनांच्या माध्यमातून तेथील शेतकऱ्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.




प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजने'च्या दूरदृष्य प्रणाली द्वारे शुभारंभानिमित्त पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहात आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात कृषीमंत्री श्री. भरणे बोलत होते. यावेळी आमदार बापू पठारे, कृषी आयुक्त सूरज मांढरे, कृषी संचालक विनयकुमार आवटे, रफिक नायकवडी, सुनील बोरकर, अशोक किरनळ्ळी, सहसंचालक दत्तात्रय गावसाने आदींसह राज्यातील कृषी सखी, प्रगतिशील महिला, पुरुष शेतकरी, कृषी विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, केंद्र व राज्य शासन शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून शेतकरी सक्षम व्हावा यादृष्टीने काम करत आहे. यावर्षी जून ते सप्टेंबरपर्यंत राज्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकरी अडचणीत आल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रीमंडळ सदस्यांनी त्या-त्या भागात दौरे करून शेतकऱ्यांचे दु:ख, अडचणी जाणून घेतल्या. या शेतकरी बांधवांना उभे केले पाहिजे यादृष्टीने राज्य शासनाने चांगले पॅकेज जाहीर केले आहे.

अनेक ठिकाणी नदीकडेला शेतीत माती राहिली नाही, वीजरोहित्र (ट्रान्सफॉर्म), वीजपंप राहिले नाहीत. त्यामुळे या नुकसानीसाठी साधारणत: ३१ हजार ६२७ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. अजूनही त्यात काही बाबींचा समावेश करण्यात येईल. यात कोरडवाहू शेतीला १८ हजार ५०० रूपये, हंगामी बागायत शेतीला २७ हजार आणि बागायती शेतीला ३२ हजार ५०० रुपये हेक्टरी असे आणि रब्बीसाठी पाणी उपलब्ध आहे अशा ठिकाणी १० हजार कोटी रुपयांची मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. राज्यात ३ हजार ५०० कृषी सखी काम करत असून त्या स्वत: प्रशिक्षण घेऊन तेथील महिला शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत आहेत. त्याचा अभिमान असून कृषी समृद्धी योजनेच्या माध्यमातून राज्य शासनाने कृषी क्षेत्राच्या विकासासाठी सुरू केलेल्या मोठ्या योजनेची माहिती घेऊन सेंद्रीय शेतीमधील तंत्रज्ञान, कृषी विभागाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी, शेतकऱ्यांना उत्पन्न वाढीसाठी कृषी सखींनी मार्गदर्शन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

## कृषी क्षेत्र नव्या परिवर्तनाच्या दिशेने : ना.फडणवीस

### एचपी ड्रीम्स अनलॉक्ड उत्सवांचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**मुंबई : हॅलो प्रभात**

आजचा काळ हा कृत्रिम बुद्धिमत्तेचा आहे. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून समाजात साक्षरता आणि समता निर्माण होऊ शकते. तंत्रज्ञान, डिजिटायझेशन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या साधनांना भौगोलिक सीमा नाहीत त्यामुळे श्रीमंत-गरीब, जाती, भाषा यांचा फरक कळत नाही. म्हणूनच हे तंत्रज्ञान प्रत्येक भारतीयांच्या कल्पनांना आकार देऊ शकते असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. एचपी आणि इंटेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ङ्गएचपी ड्रीम अनलॉक्डङ्ख या उत्सवाचे मेहबुब स्टुडिओ, बांद्रा येथे उद्घाटन करण्यात आले, त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते कार्यक्रमाला एचपी इंडिया व्यवस्थापकीय संचालिका इप्सिता दासगुप्ता, मुख्यमंत्र्यांचे सल्लागार कौस्तुभ धवसे, विपणन प्रमुख आकाश भाटिया, कायदेशीर व शासकीय व्यवहार विभाग प्रमुख राजू नायर तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शासनाने आता एआय स्वीकारण्याचे धोरण सुरू केले आहे. हे तंत्रज्ञान सर्वांसाठी खुले असून यात प्रत्येक जण आपल्या कल्पनांना वास्तवात आणू शकणार आहे. शासनाने एचपी सोबत डिजिटल मीडिया सेंटर ऑफ एक्सलन्स उभारले असून आता आणखी पुढे जाऊन सर्वसामान्यांना नव्या तंत्रज्ञानांचा, विशेषतः सहज प्रवेश मिळावा यासाठी भागीदारीचा आराखडा तयार करण्याचे ठरवले आहे. कृषीक्षेत्रातही ख चा वापर सुरू केला आहे.

पुण्यात झालेल्या ॲग्री-हॅकथॉनमध्ये तरुणांनी तयार केलेले ख मॉडेल हे हवेतील घटकांचे विश्लेषण करून पिकावर होणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव आणि सर्तक करते. हे खरोखरच गेम-चेंजर मॉडेल असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी नमूद केले की, अशा तांत्रिक हस्तक्षेपांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान टळेल, खर्च कमी होईल आणि कृषीक्षेत्रात अधिक नफा मिळेल. ख, ब्लॉकचेन आणि डिजिटायझेशन या तंत्रज्ञानांनी केवळ उद्योगच नव्हे तर शासन प्रणालीतही पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढवली असल्याचे त्यांनी सांगितले.

# गोरेगाव मल्टीस्पेशालिटी पशुवैद्यकीय रुग्णालयाच्या पुनर्बांधणीस मान्यता

## पालकमंत्री आशिष शेलार यांच्या पाठपुराव्याला यश

**मुंबई : हॅलो प्रभात**

गोरेगाव येथील मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या संकुलात आधुनिक मल्टीस्पेशालिटी पशुवैद्यकीय रुग्णालयाची पुनर्बांधणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या उपक्रमास ५८.२२ कोटींच्या प्रारंभिक अंदाजपत्रकास कृषी व पशुसंवर्धन विभागामार्फत प्रशासकीय मान्यता आजच देण्यात आली आहे. उपनगर पालकमंत्री ड. आशिष शेलार यांनी यासंदर्भात सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद देत या पशु वैद्यकीय रुग्णालयाच्या पुनर्बांधणीस प्रशासकीय मान्यता दिली. उपनगरातील पाळीव आणि मुक्त पशुंसाठी उत्कृष्ट उपचार व सेवांची सुविधा उभारली जाईल, असे मुंबई उपनगरचे पालकमंत्री ड.अशिष शेलार यांनी सांगितले. नव्या इमारतीत तळमजला व तीन मजले असा आराखडा असून १०,२१० चौ. मीटरच्या या रुग्णालयात लहान-मोठ्या प्राण्यांसाठी अत्याधुनिक व बहुविध सेवांचा समावेश आहे. उपनगरातील व मुंबईतील विविध भागातील प्राण्यांच्या उपचारासाठी येणाऱ्या नागरिकांना ही सुविधा मोलाची ठरणार आहे.




या प्रकल्पात वास्तुविशारदांची मान्यता, सौरऊर्जा प्रणालीची उभारणी व पर्यावरणपूरक बाबींचा समावेश करण्यात आला आहे. या निर्णयामुळे पशुप्रेमी, शेतकरी, रहिवासी व मुंबई महानगरातील अनेकांची जुनी मागणी पूर्ण होत आहे.

नव्या मल्टीस्पेशालिटी पशुवैद्यकीय रुग्णालयामुळे प्राण्यांच्या आरोग्यसेवेचा दर्जा आणि उपलब्धता वाढणार असून, पालकमंत्री ड. शेलार यांनी हा महत्त्वाकांक्षी उपक्रम लवकरात लवकर पूर्णत्वास नेण्याचा संकल्प केला आहे.

# महिला खेळाडूंसाठी चेंजिंग रूमची सुविधा : मंत्री माणिकराव कोकाटे

## क्रीडा संकुल, स्पोर्ट्स क्लब, स्टेडियमवर सुविधा देण्यात येणार

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्यातील महिला खेळाडूंसाठी शासनाने अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. राज्यातील सर्व क्रीडा संकुल, स्पोर्ट्स क्लब, जिमखाना, स्टेडियम तसेच स्थानिक क्रीडांगणांवर स्वतंत्र, स्वच्छ आणि सुरक्षा-सुसज्ज चेंजिंग रूमची सुविधा महिला खेळाडूंसाठी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती क्रीडा व युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.



भारतरत्न सचिन तेंडुलकर यांनी काही दिवसांपूर्वी दादर जिमखानाच्या नूतनीकरण उद्घाटनप्रसंगी महिलांना क्रीडांगणावर सुरक्षित व आदरयुक्त वातावरण मिळालेच पाहिजे, त्यासाठी देशभरातील क्रीडा संकुलात महिलांना चेंजिंग रुमची सुविधा उपलब्ध करून देण्याबद्दल आवाहन केले होते.

या आवाहनाला तत्काळ व सकारात्मक प्रतिसाद देणारे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे हे देशातील पहिले मंत्री ठरले आहेत.

क्रीडा मंत्री ड.कोकाटे यांनी सांगितले की, राज्यभरातील महिला खेळाडूंना सुरक्षित आणि सन्मानजनक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना तातडीने राबवली जाणार आहे. प्रत्येक जिल्हा, तालुका आणि स्थानिक क्रीडांगणावर या सुविधा प्राधान्याने उभारल्या जातील.

चेंजिंग रूममध्ये स्वच्छतागृह, आरोग्य सुविधा आणि आवश्यक सुरक्षिततेसाठी मर्यादित क्षेत्रात सीसीटीव्ही देखरेख ठेवली जाणार आहे. तसेच प्रत्येक ठिकाणी महिला सुरक्षा कर्मचारी नियुक्त करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जुनी इमारती दुरुस्त करणे अथवा नवीन चेंजिंग रूम बांधण्यासाठी तात्काळ प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश क्रीडा मंत्री श्री. कोकाटे यांनी दिले आहेत. या निर्णयामुळे केवळ सुविधा उपलब्ध होणार नाहीत, तर महिलांचा सहभाग आणि विश्वास क्रीडा क्षेत्रात वाढीस लागेल.

क्रीडा मंत्री ड.कोकाटे म्हणाले की, क्रीडा क्षेत्रातील प्रत्येक मुलगी आता अभिमानाने मैदानात उतरेल. तिच्या प्रत्येक यशामागे सुरक्षित आणि सन्मानित वातावरणाचा मजबूत पाया असेल. या निर्णयामुळे राज्यातील महिला खेळाडूंसाठी एक नवा अध्याय सुरू होणार असून, महाराष्ट्र महिला सक्षमीकरणाच्या दिशेने आणखी एक पुढचा टप्पा पार करत आहे.

## आपत्तीग्रस्त तालुक्यांसाठी विशेष मदत पॅकेज, सवलती लागू

### मंत्री मकरंद जाधव-पाटील; २५१ तालुके पूर्णत: तर ३१ तालुके अंशत: आपत्तीग्रस्त म्हणून घोषित

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्यात जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टी, पूर आणि विविध नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या मोठ्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने २५१ तालुके पूर्णतः तर ३१ तालुके अंशतः आपत्तीग्रस्त/ अतिवृष्टीग्रस्त म्हणून घोषित करून आपत्तीमुळे बाधितांना विशेष मदत पॅकेज आणि विविध सवलती लागू केल्या आहेत. तसेच आपदग्रस्त तालुक्यातील बाधितांना दुष्काळ सदृष्य परिस्थितीत लागू असणाऱ्या सवलती देण्यास मान्यता देण्यात आल्या आहेत. या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.



अतिवृष्टी व पुरामुळे शेतीपिकांचे नुकसान, शेतजमीन वाहून जाणे, घरांची पडझड, जनावरांची हानी आणि मालमत्तेचे नुकसान झाले आहे. या सर्व आपदग्रस्तांना तातडीने दिलासा मिळावा म्हणून राज्य शासनाने हे विशेष पॅकेज लागू केले आहे. या विशेष पॅकेजमुळे बाधित पिके, शेती, घरे, जनावरे, मत्स्यव्यवसाय, पायाभूत सुविधा दुरुस्तीस मोठा दिलासा मिळणार असल्याचा विश्वास मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी व्यक्त केला.

जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टी व पुरामुळे बाधित २५१ पूर्णतः व ३१ अंशतः बाधित तालुक्यातील बाधित पिकांचे तातडीने पंचनामे करण्यात आले. जून ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत २६.६९ लाख हेक्टर तर सप्टेंबर २०२५ मध्ये जवळ जवळ ३९ लाख हेक्टर अशा सुमारे ६५ लाख हेक्टर क्षेत्रावरील शेत पिकांचे नुकसान झाले असल्याचेही मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले

# संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा स्पर्धेसाठी निधीची तरतूद करावी

**धर्मपाल मेश्राम**

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित 'संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा २०२५' आयोजित करण्यात येणार आहे. या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आवश्यक आर्थिक तरतूद डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) व आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय) यांनी करावी, असे निर्देश महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी दिले. उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संविधान प्रश्नमंजुषा जनजागृती मोहिमेबाबत आयोगाच्या कार्यालयात बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते.



'टीआरटीआय' आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे व बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांनी या उपक्रमासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देऊन स्पर्धेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी पूर्ण सहकार्य करण्यात येईल, असे दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सांगितले.

उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम म्हणाले, आयोगाच्या पुढाकाराने इयत्ता ८ वी ते १२ वी तसेच पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी ही प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात येणार आहे. यासाठी वेबसाईटही तयार करण्यात आली आहे. या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाविषयी तसेच त्यातील मूलभूत हक्क, कर्तव्ये आणि मूल्यांविषयी जनजागृती निर्माण करणे हा आहे. विद्यार्थ्यांसाठी संविधानावर आधारित तीन भाषातील अभ्यासक्रम तयार करून जिल्हा व राज्यस्तरीय प्रश्नपत्रिका समन्वयातून तयार करण्याचेही निर्देश मेश्राम यांनी यावेळी दिले. शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार संविधान प्रश्नमंजुषेबाबत जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे.

उपक्रमाची प्रगती, विद्यार्थ्यांचा प्रतिसाद आणि अंमलबजावणीबाबतची सविस्तर माहिती सर्व संबंधित विभागांनी राज्य अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोगास सादर करावी, असे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी सांगितले.

बैठकीला आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे संशोधन अधिकारी विजय गुंड, आदिवासी विकास आयुक्त कार्यालय नाशिक येथील सहायक प्रकल्प अधिकारी अनिल महाजन, बार्टीचे प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात, युवा करिअर संस्थेचे मुनाल थूल, महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ नागपूरच्या प्राध्यापक आरती तायडे व सहप्राध्यापिका दिवीता कोठेकर तसेच संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



# पक्षप्रवेशासाठी दबाव टाकणाऱ्या आ.काळेंच्या कार्यकर्त्यांविरुद्ध ग्रामस्थांचा निषेध

## विकास कामे रोखण्याच्या धमकी देत होणाऱ्या प्रवेशांचे काळेंना निवेदन

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

कोपरगाव तालुक्यातील लौकी परिसरातील ग्रामस्थांनी आमदार आशुतोष काळे यांना निवेदन देत, काही कार्यकर्त्यांकडून गावातील जनतेवर काळे गटात प्रवेशासाठी केला जात असणाऱ्या दबावाचा तीव्र निषेध नोंदवला आहे. लोकशाहीची हत्या होणाऱ्या या दुर्देवी प्रकाराचा आमदार काळे यांना रोखून त्यांच्याच कार्यकर्त्यांबद्दल संतप्त नागरिकांनी रोष व्यक्त केला आहे.ग्रामस्थांच्या मते, गेल्या काही दिवसांपासून काळे यांचे काही कार्यकर्ते असा प्रचार करत आहे की जर पक्षप्रवेश केला,

तरच गावात रस्ता होईल, नवीन डीपी दिली जाईल आणि विविध विकासकामांना निधी मिळेल. अन्यथा निधी मिळणार नाही आणि त्याचा वापर करू देणार नाही.या विधानामुळे सामान्य नागरिकांमध्ये असंतोष व नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की विकासकामे, शासकीय योजना आणि जनतेचे मूलभूत हक्क यांना कोणत्याही राजकीय दबावाशी जोडणे हा लोकशाहीचा अवमान असून, शासनाच्या मूल्यांचा अपमान आहे. ग्रामस्थ विकासासाठी काळे यांच्या



कार्यकर्त्यांच्या दबावाखाली झुकणार नाहीत.ग्रामस्थांनी स्पष्ट केले आहे की ते कोणत्याही पक्षविरोधी नाहीत परंतु गावाच्या विकासाला अडथळा निर्माण करणाऱ्या राजकीय गोंधळाला ते मान्यता देणार नाहीत. शांततामय मार्गाने, संविधानिक हक्कांचा वापर करून ते आपला निषेध नोंदवणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत. गावातील सर्व विकासकामे पक्षनिरपेक्ष व पारदर्शक पद्धतीने करण्यात यावीत.कोणत्याही कार्यकर्त्यांकडून दबाव किंवा धमकी दिल्यास त्याची चौकशी करण्यात यावी.रस्ते, डीपी, पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा यांसारख्या कामांसाठी स्वतंत्र शासकीय मंजुरी द्यावी ते अडवून धरून गावाला वेठीस धरू नये.ग्रामस्थांच्या विचारांना व मतांना आदर देऊन लोकशाही मूल्यांचे पालन करावे.

ग्रामस्थांनी शेवटी असा इशारा दिला आहे की, गावातील विकासकामे जर राजकीय हेतूंसाठी अडवली गेली, तर ते लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यास मागे-पुढे पाहणार नाहीत.रविंद्र वलटे, सचिन खटकाळे, प्रदीप खटकाळे, गणेश खटकाळे, बापूसाहेब खटकाळे, अनिल आहेर,रमेश खटकाळे, भाऊसाहेब कदम,दत्तात्रय खटकाळे,मुकेश खिलारी,शैलेश खिलारी आदींसह ग्रामस्थांच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

## गोरक्षनाथांच्या मूर्तीची विटंबना करणाऱ्यांवर कारवाई करावी



नाथभक्तांची यवत पोलीस स्टेशनला निवेदनाद्वारे मागणी

**दौंड : हॅलो प्रभात**

दत्तभक्तांचे आराध्य तीर्थक्षेत्र गिरनार पर्वत येथील गोरक्षनाथ यांच्या मूर्तीची अज्ञात समाजकंटकांनी विटंबना करुन हिंदू धर्मियांच्या भावनांवर तीव्र आघात केला आहे. या घटनेचा निषेध करणारे निवेदन यवत पोलीस स्टेशनला सकल दौंड तालुका नाथभक्त यांच्या वतीने देण्यात आले. याप्रसंगी जयेश गायकवाड महाराज, राहुल राऊत महाराज, महेंद्र पवार महाराज, अतूल खेनट महाराज, रमेश शेलार महाराज, मुरलीधर देशमुख महाराज, तात्या काटे महाराज, धनराज मासाळ यांसह अनेक नाथभक्त यावेळी उपस्थित होते. याप्रसंगी नाथभक्तांनी आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले की ४ ऑक्टोबरच्या मध्यरात्री अज्ञात समाजकंटकांनी गोरक्षनाथ यांची मूर्ती खंडित करून नाथ संप्रदाय दत्तभक्त परिवार आणि सकल हिंदूंच्या श्रद्धांवर तीव्र आघात केला आहे. ही मूर्ती अतिशय क्रूरपणे तोडली असून त्यातून या समाजकंटकांचा हिंदू धर्म, मूर्तीपूजा यांविषयी तीव्र द्वेष दिसत आहे. प्रशासनाने ही घटना गांभीर्याने घ्यावी आणि या प्रकरणाची पाळेमुळे खणून असे प्रकार पुन्हा होणार नाहीत, यासाठी आवश्यक ती कठोर कारवाई करावी. अशी निवेदनाद्वारे मागणी केली. अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी प्रशासनाने या समाजकंटकांवर कठोर कारवाई करावी अशा आशयाच्या भावना यावेळी व्यक्त केल्या.

## सैनिकी प्रशिक्षणामुळे जीवनाला शिस्त लागते : आ.सत्यजीत तांबे

### वार ट्रॉफी टी ५५ चे लोकार्पण

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

संजीवनी सैनिकी स्कूलमधील शिस्त,प्रशिक्षण आणि मूल्याधारित संस्कार पाहता सर्व शाळांमध्ये हे प्रशिक्षण गरजेचे आहे.

स्व. शंकरराव कोल्हे यांचेप्रमाणेच विद्यार्थ्याप्रती असलेली आपुलकी आणि जबाबदारी कोल्हे कुटुंबाने जपली आहे. याच परंपरेतून संजीवनी समूहाच्या सर्व संस्था 'संजीवनी ब्रन्ड' म्हणून ओळखल्या जात आहे. सैनिकी प्रशिक्षणामुळे जीवनाला शिस्त लागते असे प्रतिपादन नाशिक पदवीधर मतदार संघाचे आमदार सत्यजीत तांबे यांनी केले.

भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाकडून १९६५ च्या भारत पाकिस्तन युध्दात वापरलेल्या



व संजीवनी सैनिकी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजला मिळालेल्या वार ट्रॉफी टी ५५ (रनगाडा) च्या लोकार्पण सोहळ्यात आमदार तांबे बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे कारखान्याचे चेअरमन विवेक कोल्हे होते. व्यासपीठावर संजीवनी युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट अमित कोल्हे, संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे विश्वस्त सुमित कोल्हे, डायरेक्टर-नॉन अॅकॅडमिक डी. एन. सांगळे व प्राचार्य कैलास दरेकर उपस्थित होते. संजीवनीच्या ब्रासबॅण्ड पथकाने देशभक्तीपर गीत गावुन उत्तम संचलनाचे सादरीकरण केले. वार ट्रॉफी टी ५५ मिळविण्यासाठी सन २०१९ पासुन संरक्षण मंत्रालयाकडे प्रयत्न चालु होते. यापुढेहि विद्यार्थ्यांना फायदा व्हावा या हेतुने एनसीसी प्रशिक्षण देण्यासाठी अधिकृत परवानगीसाठी प्रयत्न सुरू असल्याचे विश्वस्त सुमित कोल्हे यांनी यावेळी सांगीतले. प्राचार्य कैलास दरेकर यांनी आभार मानले.

> संजीवनी सैनिक स्कूल महाराष्ट्रातील ३८ उत्कृष्ट संस्थापैकी एक आहे. आदर्श नागरीक घडविणे, ही प्रत्येक शिक्षण संस्थेची जबाबदारी असते. आज इंटरनेटमुळे युवक भरकटू शकतात म्हणुन सैनिकी शाळेतील शिस्त महत्वाची आहे. युध्दात वापरलेला रणगाडा विद्यार्थ्यांना नेहमी देशसेवेची प्रेरणा देत राहील.
>
> **- विवेक कोल्हे**
> **अध्यक्ष, कोल्हे कारखाना**

## कांदा लागवड आता आधुनिक तंत्रज्ञानाच्या दिशेने




**राहुरी : हॅलो प्रभात**

कांदा लागवडीमध्ये आता आधुनिक तंत्रज्ञानाचा नवा टप्पा सुरू झाला आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील मा. प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे) व कृषी विद्या विभाग प्रमुख डॉ. आनंद सोळंके यांनी एस. पी. अग्रो इनोव्हेशन्स - प्लांटोमॅट, देवळाली प्रवरा, अहिल्यानगर येथे तयार करण्यात आलेल्या कांदा बियाणे पेरणी व रोप लागवड यंत्राची पाहणी करून मार्गदर्शन केले. हे यंत्र सौरभ कदम आणि . प्रसाद देशमुख यांनी मोठ्या परिश्रमातून आणि सखोल अभ्यासातून तयार केले. या यंत्रासाठी पेटंट मिळाले असून आतापर्यंत ५०० हून अधिक कांदा लागवड यंत्रांची निर्मिती झाली आहे. काही यंत्रे परदेशात निर्यात देखील करण्यात आली आहेत. सध्या २०० हून अधिक नवीन यंत्रांची निर्मिती सुरू असून, शेतकऱ्यांकडून वाढत्या मागणीमुळे अॅडव्हान्स बुकिंग सुरू आहे. या यांत्रिकीकरणामुळे शेतकऱ्यांचा वेळ, मजुरी आणि खर्च मोठ्या प्रमाणात वाचून दर्जेदार कांदा उत्पादनात वाढ होणार आहे.

## आय.डी बी.आय.बँकेकडून देहाडरायनगर शाळेस एल.ई.डी.संच भेट



**शेवगाव : हॅलो प्रभात**

सामाजिक बांधिलकी जपत आय.डी. बी. आय. शाखा शेवगाव यांनी सी. एस आर. फंडातून शेवगाव केंद्रातील देहाडरायनगर शाळेस फिलिप्स कंपनीचा एल ई. डी. संच भेट दिला.यावेळी शेवगाव चे शाखाधिकारी ओमप्रकाश आडे सोनई शाखेचे शाखाधिकारी हर्षद निंबाळकर , शाखेचे कर्मचारी ज्ञानेश्वर खंडागळे , भारत नेमाने , अमोल सूर्यवंशी , राहूल कचरे आदि उपस्थित होते .सदर उपक्रमाचे गटविकास अधिकारी सोनल शहा, गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ , केंद्रप्रमुख विष्णू गायकवाड शाळेचे मुख्याध्यापक रमेश गोरे , शिक्षिका सविता पवार तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा शितल गायकवाड , किशोर गायकवाड , भागवत शिंदे , सोमनाथ मोहिते , शरद मोहिते , अतुल चाबुकस्वार , आदिंनी स्वागत केले .सामाजिक बांधिलकीच्या अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांना प्रगती करता येईल असे मुख्याध्यापक रमेश गोरे यांनी सांगितले .

## ४२ हजार कोटींच्या कृषि योजनांचा लोकार्पण सोहळा संपन्न

**राहुरी : हॅलो प्रभात**

पुसा येथील राष्ट्रीय कृषि विज्ञान परिसरात देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत शेतकर्यांसाठी ४२ हजार कोटींहून अधिक कृषि योजनांचा लोकार्पण सोहळा पार पडला.यावेळी देशाचे कृषि मंत्री शिवाराजसिंग चौहान, राज्यकृषि मंत्री भागीरथ चौधरी व्यासपीठावर उपस्थित होते. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचे ऑनलाईन प्रक्षेपन करण्यात आले.



याप्रसंगी कृषि तंत्रज्ञान शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजू अमोलिक, मृदाशास्त्र व कृषि रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. भिमराव कांबळे, कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र हिले, कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे, आंतरविद्याशाखा जलसिंचन विभाग प्रमुख डॉ. विजयकुमार पाटील, जीवरसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रकाश लोखंडे, प्रमुख शास्त्रज्ञ बियाणे डॉ. नितीन दानवले व कापूस सुधार प्रकल्पाचे प्रमुख डॉ. पवन कुलवाल उपस्थित होते. विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे म्हणाले शेतकर्यांच्या प्रगती आणि समृध्दीसाठी देशाचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी ४० हजार कोटींहून अधिक खर्चाच्या योजनांची भेट शेतकर्यांना आज दिली आहे. यामुळे खर्या अर्थाने शेतकर्यांचा सन्मान झाला आहे. प्रधानमंत्री धनधान्य योजनेमुळे पिकांचे सरासरी उत्पादन व शेतकर्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल आणि कडधान्य अभियानामुळे देश कडधान्यात स्वयंपूर्ण होइल. यावेळी डॉ. प्रशांत बोडके, डॉ. सुरेश दोडके, डॉ. विजू अमोलिक आणि डॉ. उल्हास सुर्वे यानी उपस्थित शेतकरी व विद्यार्थी यांना मार्गदर्शन केले. शास्त्रज्ञ,शेतकरी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कै.लालाशेठ बिहाणी विद्यालयाचे क्रीडा स्पर्धेत यश

**राहुरी : हॅलो प्रभात**



क्रीडा व युवक संचालनालय, पुणे आणि जिल्हा क्रीडा कार्यालय, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय ज्युडो स्पर्धा त्रिमूर्ती क्रीडा संकुल, नेवासा फाटा येथे संपन्न झाली. या स्पर्धेत राहुरी येथील कै. लालाशेठ बिहाणी विद्यामंदिर प्रशालाच्या खेळाडू चि. तुषार कैलास रणसिंग ने ६६ किलो वजन गटात जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला. या यशामुळे त्याची विभाग स्तरावर निवड झाली असून त्याच्या कामगिरीबद्दल शिक्षक व सहपाठ्यांनी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले.याचबरोबर, क्रीडा व युवक संचालनालय, पुणे तसेच जिल्हा क्रीडा कार्यालय, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय पावसाळी खो-खो स्पर्धा महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत राहुरी तालुक्यातील विविध शाळांच्या संघांनी चुरशीची सामने खेळले. कै. लालाशेठ बिहाणी विद्यामंदिर प्रशाला, राहुरीच्या १७ वर्ष वयोगटातील मुलांच्या संघाने अनुक्रमे वांबोरी व कणगर संघांना पराभूत करत अंतिम फेरीत प्रवेश मिळविला. अंतिम सामन्यात त्यांनी म्हैसगाव संघावर मात करून तालुकास्तरीय प्रथम क्रमांकाचे विजेतेपद पटकावले. या यशामुळे विद्यालयाचा संघ आता जिल्हास्तरावर प्रतिनिधित्व करणार आहे.दोन्ही संघांना क्रीडा शिक्षक पंकज जगताप व मनोज सुपेकर यांनी मार्गदर्शन केले. या यशामुळे विद्यालयात आनंदाचे वातावरण आहे. राहुरी एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा प्रभावतीताई बिहाणी, सचिव मनोज बिहाणी, सहसचिव अनुप बिहाणी, विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक राहुल जगताप, ज्येष्ठ शिक्षक भाऊसाहेब मोरे, बाबासाहेब गुंजाळ यांनी विजयी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

> **सहभागी खेळाडू**
> गुंजाळ हर्षल बाळासाहेब, शेख शाहिद खलिल, पवार ऋतिक राजू, गुंजाळ गणेश राजेंद्र, शेख साद मोसिन, साळवे प्राज शांतवन, जगधने श्रेयस मच्छिंद्र, कोहकडे सुशांत संजय, कासार नटराज गणेश, कोहकडे समर्थ भागवत, तनपुरे मयूर रवींद्र, कुसमुडे साहिल श्यामराव, गाचंडे अमर वैजिनाथ, आघाव सार्थक बाबासाहेब, हिवाळे सिद्धांत दत्तात्रय.

## ठाकरे शिवसेनेत जिल्ह्यात खांदेपालट, पदाधिकाऱ्यांत खळबळ

**राहुरी : हॅलो प्रभात**

गेली वीस वर्ष राहुरीचे रावसाहेब खेवरे शिवसेनेचे गड लढवीत होते. शुक्रवारी शिवसेना मध्यवर्ती कार्यालयाने उत्तर अहिल्यानगर दोन जिल्हाप्रमुख यांची नव्याने वर्णी लावली .अकोले येथील उद्योजक जगदीश चौधरी व सचिन कोते



असे दोन जिल्हाप्रमुख शिवसेनेने जिल्ह्यात दिले . नव्या चेहऱ्यांना संधी दिली.निष्ठावंतांच्या नावाने आलेली मरगळ झटकली. शिवसेना फुटली तेव्हा रावसाहेब खेवरे यांना शिंदे सेनेने ऑफर दिली होती,

मात्र ती त्यांनी नाकारली. रावसाहेब खेवरे याच्यावर सध्या शिर्डी लोकसभा संघटक पदाची जबाबदारी देण्यात आली. नव्याने निवडलेले पदाधिकारी स्थानिक स्वराज्य निवडणूक आगोदर निवडल्याने सेनेत खांदेपालट झाली.

या निवडीने महाविकास आघाडीची जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीत ठाकरे गट प्रभावी ठरले.

# कोपरगावमध्ये शासन योजनेमार्फत मोफत कॅन्सर उपचार

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

अशोका कॅन्सर सेंटर्स ऑफ अमेरिका, नाशिक आणि वृंदावन डायग्नोस्टिक सर्व्हिसेस, कोपरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार्य उद्घाटन व संवाद सोहळा हा कार्यक्रम आज (११ ऑक्टोबर २०२५) शिर्डी येथील हॉटेल टेम्पल ट्री येथे उत्साहात आणि आनंदात पार पडला.

या कार्यक्रमास डॉ. राजेश वाळवेकर, वरिष्ठ सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट - कॅन्सर सेंटर ऑफ अमेरिका, नाशिक; डॉ. लोविन विल्सन, मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट - कॅन्सर सेंटर ऑफ अमेरिका; तसेच डॉ. संदीप मुरुमकर, व्यवस्थापकीय संचालक - वृंदावन डायग्नोस्टिक सर्व्हिसेस, कोपरगाव यांच्या प्रमुख उपस्थिती होती.या सहकार्याचा उद्देश ग्रामीण भागातील कॅन्सर रुग्णांसाठी उच्च दर्जाची वैद्यकीय सेवा त्यांच्या तालुक्यातच सुलभ, सहज आणि परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देणे हा आहे.




विशेष म्हणजे या उपक्रमाअंतर्गत शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेत तसेच खाजगी इन्शुरन्स योजनांमार्फत मोफत कॅन्सर उपचाराची सुविधा उपलब्ध होणार आहे.या माध्यमातून दर महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या बुधवारी तज्ज्ञ डॉक्टर कोपरगावमध्ये उपस्थित राहून कॅन्सर रुग्णांची सल्लामसलत आणि तपासणी करणार आहेत. त्यामुळे रुग्णांना आता प्राथमिक निदान, सल्लामसलत व फॉलोअपसाठी नाशिकला जाण्याची गरज उरणार नाही.

डॉ. राजेश वाळवेकर आणि डॉ. लोविन विल्सन यांनी ग्रामीण भागात कॅन्सर उपचार सुलभ करण्याचा हा उपक्रम आरोग्य क्षेत्रात मोठा बदल घडवेल, असे सांगितले. तसेच डॉ. संदीप मुरुमकर यांनी वृंदावन डायग्नोस्टिक सर्व्हिसेसमध्ये उपलब्ध असलेल्या अत्याधुनिक तपासण्यांची माहिती दिली. या भागीदारीमुळे कोपरगाव व परिसरातील कॅन्सर रुग्णांना महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेत तसेच खाजगी इन्शुरन्स योजनांद्वारे मोफत, तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधांसह उपचार मिळणार असून, ही ग्रामीण भागातील आरोग्यसेवेसाठी एक ऐतिहासिक पाऊल ठरले आहे.

## केवायसीची लिंक करतोय 'लाखाचे बारा हजार'

**सातारा : हॅलो प्रभात**

सायबर क्राईम हा मोबाईल ऑनलाईनमुळेच होत असून, दिवसेंदिवस फसवणूक करण्याच्या पद्धतीमध्ये वाढ होत आहे. केवायसीच्या नावाखाली गंडा घातला जात आहे. केवायसी करायची असल्याची बतावणी करून एसएमएसमध्ये लिंक दिली जात आहे. त्यावर क्लिक होताच बँक डिटेल्सची माहिती चोरट्यांना मिळत आहे. त्यातूनच लाखाचे बारा हजार होत असल्याचे अनेक किस्से सातारा जिल्ह्यात समोर येऊ लागले आहेत.

# व्यवसायिकांसाठी खुशखबर

सांगली, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, पुणे,
अहमदनगर सह संपूर्ण महाराष्ट्रात
डिजिटलच्या माध्यमातून तब्बल सात लाख वाचकांपर्यंत
पोहोचणाऱ्या दैनिक **हॅलो प्रभात** सोबत
आपल्या व्यवसायाची जाहिरात करण्याची...



## सुवर्णसंधी



| जाहिरात साईज | प्रसिद्धी कालावधी | किंमत |
|---|---|---|
| 08X05 cm | संपूर्ण महिना | ५०००/- |
| 08X10 cm | संपूर्ण महिना | ७०००/- |
| 12X10 cm | संपूर्ण महिना | १००००/- |

टीप : सदर जाहिरातीचे दर हे फक्त डिजिटल आवृत्तीसाठी लागू आहेत.

**शुभेच्छा जाहीरात, जाहीर नोटीस,
छोट्या जाहीराती, टेंडर नोटीस व सर्व प्रकारच्या
जाहीरात प्रसिद्धीसाठी...**

## एकवेळ अवश्य संपर्क साधा

# दै. हॅलो प्रभात

**फोन : 9094277171 / 9011889001**

• छापील प्रत मिळिवण्यासाठी संपर्क : **9021651976**